**LIB 013**

# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : घटना, घडामोडी, भाष्य

ज्ञानगंगा घरोघरी

*संपादक*

डॉ. मधुकर शेवाळे

*संपादक मंडळ*

प्रा. प्रवीण घोडेस्वार

डॉ. राजेंद्र कुंभार

डॉ. मोहन खेरडे

डॉ. सुषमा पौडवाल

डॉ. धर्मराज वीर

© *२०१५*

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

*निर्मिती*

श्री. आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, य. च. म. मुक्त विद्यापीठ

*मुद्रक*

श्री. अरविंद पोतनीस, श्री ऑफसेट प्रेस, ७ ए, नाईस, सातपूर, नाशिक – ७

*प्रकाशक*

डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**वर्गणी व व्यवस्थापन –** डॉ. मधुकर शेवाळे, उप-ग्रंथपाल व प्रमुख, ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२.

**संपादकीय (साहित्य पाठविण्यासाठी) –** डॉ. मधुकर शेवाळे, उप-ग्रंथपाल व प्रमुख, ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२.

□ या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# ज्ञानगंगोत्री

वर्ष १५ वे    ज्ञानगंगोत्री : डिसेंबर २०१४ – मे २०१५    अंक ३ व ४

ISSN 2231-6507

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| □ | संपादकीय | | २ |
| □ | सार्वजनिक ग्रंथालयांसाठी काही नावीन्यपूर्ण उपक्रम | डॉ. राजेंद्र कुंभार | ४ |
| □ | सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासात राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानची भूमिका | प्रा. कल्पना शा. सोनवणे<br>प्रा. प्रदीप तु. पाटील | १३ |
| □ | आभासी ग्रंथालय | प्रा. कल्पना शा. सोनवणे<br>प्रा. प्रदीप तु. पाटील | २२ |
| □ | ग्रे लिटरेचर | खांडेकर जी. बी. | ३० |
| □ | ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्राचे मूल्यमापन करताना विचारात घ्यावयाचे निकष | श्रीमती नीता पांडुरंग पाटील<br>डॉ. नमिता बाबासाहेब खोत | ४३ |
| □ | ग्रंथपरिचय | डॉ. राजेंद्र विठ्ठल चिकटे | ५६ |

| | | |
|---|---|---|
| सुट्या अंकाची किंमत | : संस्था रु. १०० | व्यक्ती : रु. ३० |
| वार्षिक वर्गणी | : संस्था रु. ४०० | व्यक्ती : रु. १२० |

मागील अंक उपलब्धतेनुसार पाठविले जातील. वर्गणीचा धनाकर्ष (डीडी) 'वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक' या नावे काढलेला आणि नाशिक येथे देय असावा.

B-14-15-110

# संपादकीय

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ग्रंथालय सेवांचे स्वरूप बदललेले आहे. प्रामुख्याने वाचनसाहित्य प्रकारातील बदल आणि या बदलांच्या अनुषंगाने द्यावयाच्या सेवा हा भाग महत्त्वपूर्ण आहे. ग्रंथालयांनी आता बदलत्या परिस्थितीत वाचकांना आवश्यक असणाऱ्या सेवा–सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ह्या सेवा केवळ ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांसाठीच उपलब्ध करावयाच्या आहेत असे नसून जे वाचक ग्रंथालयात येऊ शकत नाहीत, त्यांच्या साठीही ग्रंथालय सेवांची पूर्ती होणे आवश्यक आहे. विशेषतः दूर अंतरावरील विद्यार्थ्यांसाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून सेवा उपलब्ध करणे ही काळाची गरज आहे. शैक्षणिक, सार्वजनिक, विशेष अशा सर्व प्रकारच्या ग्रंथालयांमधून इलेक्ट्रॉनिक वाचनसाहित्य काही प्रमाणात का होईना उपयोगात आणले जात आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या बाबतीत विशेष ग्रंथालये आणि विद्यापीठ ग्रंथालये सेवा उपयोजनात आघाडीवर आहेत. सार्वजनिक ग्रंथालये तुलनेने या बाबतीत उदासीन असल्याचे दिसून येतात. मात्र यापुढील काळात सार्वजनिक ग्रंथालये अधिक सक्षम बनवून व माहिती तंत्रज्ञानाचा आधार घेऊन वाचकांना उत्कृष्ट सेवा देण्यास समर्थ करण्याकरिता उपाय योजने अत्यावश्यक बाब ठरणार आहे. सर्जनशील समाजाची निर्मिती करावयाची असेल तर त्याची सुरुवात ही ग्रंथालयापासूनच होणे गरजेचे आहे.

प्रस्तुत अंकामध्ये प्रा. कुंभार लिखित 'सार्वजनिक ग्रंथालयांसाठी काही नावीन्यपूर्ण उपक्रम' या लेखात कोणते नवीन उपक्रम सुरू करता येतील याबाबत सर्वांगीण चर्चा केलेली आहे. श्रीमती सोनवणे आणि श्री. पाटील यांनी सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासात राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानची भूमिका आणि आभासी ग्रंथालय यावर विचार व्यक्त केलेले आहेत. ग्रे लिटरेचर हा एक उपयुक्त वाचनसाहित्याचा प्रकार असून ग्रे लिटरेचरचा  इतिहास, व्याप्ती, वैशिष्ट्ये, प्रकार या संदर्भात श्री. खंदारे यांनी अभ्यासपूर्ण लेख सादर केलेला आहे. ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्रांचे मूल्यमापन करताना विचारात घ्यावयाचे निकष काय असावेत याबाबत डॉ. नमिता खोत आणि श्रीमती नीता पाटील यांनी उपयुक्त चर्चा केलेली आहे. त्याचबरोबर नियमित स्वरूपातील



ग्रंथपरिचयही देण्यात आलेला आहे. ज्ञानगंगोत्री त्रैमासिकाच्या माध्यमातून नियमित स्वरूपात विविध घटना, घडामोडींच्या माध्यमातून ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील माहितीचे वितरण करण्याचा प्रयत्न विद्यापीठामार्फत करण्यात येत आहे. आपणास या अंकातील संकल्पना, विचार निश्चितच उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरतील. आपणास अंतिम परीक्षेसाठी शुभेच्छा !

**डॉ. मधुकर शेवाळे**
संपादक

# सार्वजनिक ग्रंथालयांसाठी काही नावीन्यपूर्ण उपक्रम

डॉ. राजेंद्र कुंभार
प्राध्यापक, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
kumbharrajendra@yahoo.co.in

*अधिक परिणामकारक आणि समाजोपयोगी होण्यासाठी तसेच आपले यशस्वी अस्तित्व टिकविण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांनी नवनवीन, नावीन्यपूर्ण उपक्रम योजले पाहिजेत. सदर लेखामध्ये हरित ग्रंथालये, कन्या आणि महिलारत्न ग्रंथालये, आरोग्य ग्रंथालये, बालवैज्ञानिक ग्रंथालये, पालक-वाचन सल्ला केंद्र, लेखन कार्यशाळा, ग्रंथविक्री केंद्र, बाल आणि वृद्ध वाचकांसाठी वाचनसेवा, इत्यादी नावीन्यपूर्ण उपक्रमांद्वारे सार्वजनिक ग्रंथालये आपली उपयुक्तता कशी वाढवू शकतात याचे सविस्तर विवेचन केले आहे. नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी शासन आणि इतर सामाजिक संस्था यांनी काय केले पाहिजे याबाबत थोडक्यात अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.*

## प्रस्तावना

सार्वजनिक ग्रंथालये मुलतः दोन उद्देशाने अस्तित्वात आली. एक म्हणजे नागरिकांना मोफत वा कमीत कमी शुल्कामध्ये वाचनसाहित्य पुरविणे आणि दुसरे म्हणजे वाचनसुविधा विशेषतः वाचनासाठी जागा आणि फर्निचर उपलब्ध करणे. पहिल्या सेवेमुळे त्यांना ग्रंथालये तर दुसऱ्या कारणामुळे त्यांना वाचनालये वा अभ्यासिका असे संबोधले जाते. शतकाहून जास्त काळापासून सार्वजनिक ग्रंथालये भारतीय समाजाला



वाचनसुविधा पुरवीत आहेत. तत्कालीन समाजसुधारकांच्या दूरदृष्टीमुळे भारतामध्ये शिक्षणाचा प्रसार झाला. शिक्षणासाठी सहायक सुविधा म्हणून ग्रंथालयांचा विकास झाला. औपचारिक शिक्षणामध्ये तसेच संशोधनामध्ये ग्रंथालय सुविधेचा फायदा अधिक स्पष्टपणे जाणवतो. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांच्या तुलनेत शैक्षणिक आणि संशोधन ग्रंथालय यांचा अधिक विकास झाला. सार्वजनिक ग्रंथालये समाजविकासासाठी अधिक उपयुक्त असूनसुद्धा योग्य शासकीय धोरणांअभावी आणि आर्थिक पाठबळाअभावी त्यांचा भारतामध्ये समाधानकारक विकास झालेला नाही.

थोडेसे निराशाजनक चित्र असले तरी सार्वजनिक ग्रंथालयांच्या बाबतीत अगदीच सर्वकाही बिघडले आहे असे मात्र मला वाटत नाही. कारण आपल्या देशात, अर्थात महाराष्ट्रातसुद्धा, विशेषतः स्वातंत्र्यानंतर सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या फार वाढलेली आहे. त्यांच्याकडील वाचनसाहित्याची संख्या आणि विविधताही वाढलेली आहे. एवढेच नाही तर त्यांच्या उपक्रमांची विविधता आणि प्रमाणही वाढले. केंद्र आणि राज्य शासनांनी नवीन धोरणांची आणि उपक्रमांची अंमलबजावणी करून सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासाला त्यांच्यापरीने भरीव योगदान यापूर्वी दिलेले आहे, सध्या देत आहेत. मला खात्री आहे की यापुढेही ते देत राहतील.

असे म्हटले जाते की, बदल ही एक सातत्याने घडणारी बाब आहे. बदल हा सजीवत्त्वाचा निर्देशक आहे. त्यामुळेच जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये, पैलूमध्ये सतत काहीना काही बदल होत असतो. काही बदल लादले जातात तर काही स्वयंस्फूर्तीने घडवून आणले जातात. अर्थात् बदल कोणताही असो, बदल आला की आव्हाने आलीच. सार्वजनिक ग्रंथालयेही बदलाच्या परिणामांपासून दूर राहू शकत नाहीत. सभोवतालची आर्थिक, सामाजिक, तांत्रिक शैक्षणिक, राजकीय परिस्थिती बदलत आहे आणि या बदलांना सामोरे जाण्यासाठी सार्वजनिक वाचनालयांना बदलणे गरजेचे झाले आहे. विशेषतः इंटरनेट हे साधन सार्वजनिक आणि इतर ग्रंथालयांना एक आव्हान म्हणून विकसित होत आहे. इंटरनेट ग्रंथालयांना एक पर्याय होऊ पाहत आहे. अशा या बदललेल्या परिस्थितीत यशस्वीपणे टिकण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांनी त्यांच्या सध्याच्या सेवा आणि उपक्रमांमध्ये परिस्थितीनुरूप बदल केले पाहिजेत. नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले पाहिजेत. सदर लेखामध्ये काही नावीन्यपूर्ण उपक्रमांचे वर्णन केले आहे. यातील काही उपक्रम काही सार्वजनिक ग्रंथालये राबवीत असण्याची शक्यता मी नाकारत नाही.

## सार्वजनिक ग्रंथालयांसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम

एखादी संपूर्ण नवीन संकल्पना, योजना राबविणे म्हणजे नावीन्यपूर्ण उपक्रम. जर पूर्वीचीच सेवा वा उपक्रम नवीन पद्धतीने राबविण्यात येत असेल, तर त्यालाही नावीन्यपूर्ण

उपक्रमच म्हणता येईल. विशेषतः चमत्कारिक किंवा आश्चर्यकारक किंवा ज्याला 'मॅड' म्हणता येईल अशी योजना राबविणे म्हणजेही नावीन्यपूर्णताच असते. आजच्या यशस्वी व्यावसायिक जगाकडे तसेच वैज्ञानिक जगाकडे व्यवस्थित पाहिले तर तुमच्या लक्षात येईल की, आजचे बहुतांश व्यवसाय, व्यावसायिक योजना एवढेच नाही तर बहुतांश वैज्ञानिक शोधसुद्धा सुरुवातील 'मॅड कल्पना' म्हणून संबोधले गेले होते. मला वाटते की, आता वेळ आली आहे की सार्वजनिक ग्रंथालयांनीही नवीन, आश्चर्यकारक परंतु अधिक उपयुक्त सेवा/उपक्रम राबवून आपले अस्तित्व यशस्वीपणे टिकवावे. सार्वजनिक ग्रंथालयांनी प्रयत्न करण्यायोग्य काही नावीन्यपूर्ण उपक्रम खालीलप्रमाणे सांगता येतील.

## गृहपाठ सुविधा केंद्र

बाल वाचक हा सार्वजनिक ग्रंथालयांचा सध्या एक दुर्लक्षित वाचकवर्ग आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही आणि म्हणून सध्याच्या सार्वजनिक ग्रंथालयांनी बाल वाचकांसाठी जास्तीत जास्त उपक्रम राबविले पाहिजेत. याची अनेक कारणे आहेत. आपल्याकडील शालेय ग्रंथालये अपेक्षेएवढी विकसित झालेली नाहीत, हे दुर्दैवाने का होईना आपणास मान्य करावे लागेल. अशा परिस्थितीत एकतर पालकांनी मुलांच्या वाचनावर अधिक खर्च केला पाहिजे किंवा सार्वजनिक ग्रंथालयांनी तरी बालकांना समाधानकारक वाचनसुविधा पुरविल्या पाहिजेत.

बाल वाचक त्याचे बहुतांश वाचन हे त्यांच्या अध्ययन प्रक्रियेचा अत्यावश्यक भाग म्हणून करत असतात. गृहपाठ हा अध्यापन-अध्ययन प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग आहे. शाळेची मर्यादित वेळ (दोन शिफ्टमध्ये शाळा चालविण्यात येत असल्यामुळे), विद्यार्थ्यांना आवश्यक असलेला अधिकचा सराव, अभ्यास आणि अध्ययन पद्धतीची आवश्यकता, इत्यादींमुळे गृहपाठ ही शालेय शिक्षणातील एक अत्यंत आवश्यक कृती झाली आहे. नोकरी करणाऱ्या मातांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. बहुतांश कुटुंबामध्ये आजी-आजोबांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवत आहे. एक मूल असलेल्या कुटुंबामध्ये तर मोठी बहीण किंवा मोठा भाऊही नसतो. अशा परिस्थितीत शाळेतून घरी आलेल्या विद्यार्थ्याचा गृहपाठ कोणी करून घ्यावयाचा ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे. आर्थिक कुवत असणारे पालक त्यांच्या मुलांना शिकवणी वर्गाला पाठवून या समस्येवर मार्ग काढत असतात, परंतु सर्वच पालकांना या सुविधेचा लाभ घेता येतो असे नाही.

सार्वजनिक ग्रंथालये, पालकांना आणि पर्यायाने समाजाला या बाबतीत मदत करू शकतात. यासाठी सार्वजनिक वाचनालयांनी चक्क गृहपाठ सुविधा केंद्र काढावे



असे मला वाटते. माझ्या कल्पनेप्रमाणे हे गृहपाठ सुविधा केंद्र पुढीलप्रमाणे कार्य करू शकेल.

वेळ : सार्वजनिक वाचनालयामध्ये गृहपाठ सुविधा केंद्र सकाळी ९ ते ११ आणि दुपारी ३ ते ५ यावेळेत कार्यरत असावे.

सुविधा : जागा, टेबल, खुर्च्या, लाईट, संगणक, शिक्षण सहायक (Learning Assistant) (दादा किंवा ताई) असावेत.

कार्यपद्धती : विद्यार्थ्याने त्याच्या शाळेच्या वेळेव्यतिरिक्त सार्वजनिक ग्रंथालयात यावे. सार्वजनिक ग्रंथालयाने जागा, टेबल, खुर्च्या आणि लाईट, इत्यादी मूलभूत सुविधांबरोबर आणखी दोन सुविधा उपलब्ध कराव्यात. एक म्हणजे इंटरनेट सुविधेसह संगणक उपलब्ध करावा. आताची सार्वजनिक ग्रंथालयाची स्थिती पाहता हे शक्य आहे. ज्या सार्वजनिक ग्रंथालयांना सध्या ही सुविधा देणे शक्य नाही त्यांना शासनाने, राजकीय पक्षांनी, सामाजिक संस्थांनी यासाठी मदत करावी. दुसरी सुविधा म्हणजे शिक्षण सहायक (दादा किंवा ताई) उपलब्ध करणे. बहुतांश विद्यार्थ्यांना गृहपाठ पूर्ण करण्यासाठी मदतीची गरज असते. शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची या कार्यासाठी मदत घेता येईल, कारण या विद्यार्थ्यांना तसेही पुढे शालेय विद्यार्थ्यांना शिकवायचे असते. सार्वजनिक ग्रंथालयाचा गृहपाठ सुविधा केंद्रामध्ये हे महाविद्यालयीन विद्यार्थी एक किंवा दोन तास विद्यार्थ्यांना गृहपाठ करण्यामध्ये मदत करू शकतात. यातून त्यांचे स्वतःचेही शिक्षण होईल. त्यांचा शिकवण्याचा अनुभव समृद्ध होईल. पाहिजेतर शासनाने या बाबतीत योग्य तो धोरणात्मक निर्णय घ्यावा, ज्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांना गृहपाठ सुविधा केंद्रासाठी शिक्षण सहायक (दादा/ताई) सहजसुलभ उपलब्ध होतील. हे शक्य नसेल तर महाविद्यालयात आणि विद्यापीठामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सार्वजनिक ग्रंथालयाच्या गृहपाठ सुविधा केंद्रासाठी दररोज किंवा आठवड्यातून एक-दोन तास देण्याची विनंती करता येईल. पूर्वी टिच इंडिया उपक्रमांतर्गत एका संस्थेने महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या उपक्रमासाठी अवाहन केले होते आणि त्याला खूप चांगला प्रतिसाद मिळाला होता. एकाच गृहपाठ सुविधा केंद्रामध्ये एकावेळेस एकापेक्षा जास्त शिक्षण सहायक उपस्थित राहू शकतात आणि ते सर्व विविध विषयांचे (जसे विज्ञान, गणित, इंग्रजी, मराठी, इतिहास, इत्यादी) असतील तर आणखी उत्तम. कारण प्रत्येकाच्या विशेषीकरणाचा अभ्यासार्थींना फायदा होऊ शकतो.

शिक्षण सहायकांनी त्यांच्या स्वतःच्या आवडीच्या आणि अभ्यास असलेल्या विषयाचे गृहपाठ करण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करावी. आवश्यक असेल तेथे इंटरनेट

सुविधेचा वापर करावा, त्यामुळे अद्ययावत माहिती तर मिळेलच शिवाय शालेय मुलांचा आणि पालकांचा गृहपाठ सुविधा केंद्रावरील विश्वास अधिक दृढ होईल. अर्थातच गृहपाठ विषयाबाबत अधिक माहिती मिळविण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांनी आणि शिक्षण सहायकांनी संबंधित ग्रंथालयातील वाचनसाहित्याचा वापर करावा.

सार्वजनिक ग्रंथालयाच्या गृहपाठ सुविधा केंद्राचे अनेक फायदे मिळू शकतात. जसे, सर्व विद्यार्थी, शिक्षण सहायक आणि सार्वजनिक ग्रंथालयाच्या मदतीने एकत्रितपणे गृहपाठ करत असल्यामुळे सहअध्ययन होईल. एकट्याने केलेल्या अभ्यासापेक्षा एकत्रितपणे केलेला अभ्यास अधिक चांगला होण्याची शक्यता आहे. यामुळे समूहामध्ये, टीममध्ये कार्य करण्याची विद्यार्थ्यांची क्षमता अधिक विकसित होईल. सार्वजनिक ग्रंथालयातर्फे उपलब्ध केलेल्या अशा या गृहपाठ सुविधा केंद्रातील गृहपाठ प्रक्रियेत अनेक घटक सहभागी होत असल्यामुळे खरे तर या सुविधेला सार्वजनिक गृहपाठ मंडळ असेही म्हणता येईल. शाळेव्यतिरिक्त किमान आणखी एक दोन तास विद्यार्थी शैक्षणिक वातावरणात राहतील म्हणून पालकांना त्यांच्या पाल्यांची काळजी वाटणार नाही. काही पालकांना तर मुलांना शाळेव्यतिरिक्तच्या वेळेत कोठे ठेवावे हा प्रश्नच असतो. अशा पालकांसाठी सार्वजनिक ग्रंथालयातील गृहपाठ सुविधा केंद्र अत्यंत मोलाचे ठरू शकते. कारण त्यांचा पाल्य शाळेव्यतिरिक्त आणखी एक-दोन तास गृहपाठ करण्यात, शिकण्यामध्ये व्यतीत करणार आहे. याचे त्यांना समाधान असणार आहे. आणखी फायदा म्हणजे या उपक्रमामुळे विद्यार्थी त्यांच्या शालेय जीवनापासूनच सार्वजनिक ग्रंथालयाच्या संपर्कात येतील. त्यांना सार्वजनिक ग्रंथालयाबद्दल आपुलकी वाटेल, प्रेम निर्माण होईल आणि पर्यायाने सार्वजनिक ग्रंथालयांना अजन्म ग्रंथमित्र मिळतील. यातूनच सार्वजनिक ग्रंथालयांच्या ग्रंथमित्रांची (Friends of Libraries) संख्या वाढेल. सार्वजनिक ग्रंथालयासाठी कायमस्वरूपी समर्थक निर्माण होतील. सहायक दादा / ताईकडून ( की जे त्यांच्यापेक्षा फार मोठे नाहीत आणि मुख्य म्हणजे शिक्षक नाहीत) मदत घेत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये मोकळेपणा असेल. हे त्यांच्यातील मित्रत्वाच्या नात्यामुळे शक्य होईल. शाळेतील शिक्षकांकडून शिकत असताना काही वेळेस मर्यादा येतात. मोकळेपणा राहत नाही. महाविद्यालयीन / विद्यापीठीय विद्यार्थी सार्वजनिक ग्रंथालयाच्या गृहपाठ सुविधा केंद्रामध्ये अनौपचारिकपणे अध्ययनाचे कार्य करतात, त्यामुळे त्यांना अध्ययनामध्ये गोडी निर्माण होऊ शकते. यातून देशाला उत्तम शिक्षक मिळू शकतात. अनेक महाविद्यालयांमध्ये आणि विद्यापीठामध्ये गरजू विद्यार्थ्यांसाठी 'कमवा शिका' योजना राबविण्यात येते. सार्वजनिक ग्रंथालये संबंधित पालकांच्या मदतीने या उपक्रमातील शिक्षण सहायकांना (दादा / ताई) काही आर्थिक



मदत करण्यासाठी प्रयत्न करू शकतील. आजच्या काळामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांचा हा सर्वांत उपयुक्त आणि नावीन्यपूर्ण उपक्रम होईल याची मला खात्री वाटते.

## वाचन सल्ला केंद्र

सल्ला देणे हे कोणत्याही पेशाचे/व्यवसायाचे (Profession) महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. वैद्यकीय व्यावसायिक, विधीज्ञ हे सल्ला देण्याचेच कार्य करतात. ग्रंथपाल व्यावसायिकांकडूनही वाचनविषयक सल्ला मिळावा ही समाजाची रास्त अपेक्षा आहे. एवढेच नाहीतर वाचनविषयक सल्ल्याची नितांत आवश्यकताही आहे. पालक, शिक्षक आणि इतर सर्वच सबंधित घटक सतत अशी काळजी व्यक्त करतात की, आजचा विद्यार्थी/ तरुणवर्ग फारसा वाचत नाही. विद्यार्थ्यांनी, तरुणांनी खूप वाचन करावे अशी पालकांची, शिक्षकांची रास्त अपेक्षा आहे. ग्रंथपालांना तर नक्कीच वाटते की, सर्वांनीच (यामध्ये विद्यार्थी, तरुण आणि पालकांसह समाजातील इतर घटकही आलेच) खूप वाचन करावे. परंतु काय वाचावे ही विद्यार्थी, तरुण, पालक आणि सर्वच संभाव्य वाचकांची खरी अडचण आहे. वाचनाची इच्छा असणाऱ्या सर्व वाचकांना नेहमीच हा प्रश्न पडतो. उपलब्ध वाचनसाहित्याची संख्या आणि विविधता विचारात घेता हा प्रश्न पडतो. उपलब्ध वाचनसाहित्याची संख्या आणि विविधता विचारात घेता हा प्रश्न अधिक गंभीर होतो. अगदी वाढदिवसानिमित्त ग्रंथ भेट देऊ इच्छिणाऱ्यानांही 'कोणता ग्रंथ भेट द्यावा' ही समस्या भेडसावीत असते. थोडक्यात, समाजामध्ये वाचनविषयक सल्याची आवश्यकता आहे. यामध्ये कोणत्या वयातील वाचकांनी काय वाचावे, विशिष्ट हेतूसाठी काय वाचावे, मुलींनी काय वाचावे. महिलांनी काय वाचावे, वृद्धांनी काय वाचावे इत्यादीबाबत मार्गदर्शन अपेक्षित असते.

विशेषतः नुकतेच वाचन करू लागलेल्या बाल वाचकाने सुरुवातीला काय वाचावे की ज्यामुळे ज्याला वाचनाची गोडी लागेल. त्याच्यामध्ये वाचन अभिरुची निर्माण होईल, हे कोणीतरी जाणकाराने, अभ्यासकाने सांगणे सयुक्तिक ठरेल. यासाठी सार्वजनिक ग्रंथालयाच्या सेवकांनी हळूहळू का होईना वाचनसल्ला देण्यासाठी स्वतःला तयार केले पाहिजे. म्हणजेच त्याने स्वतः अनेक ग्रंथांबद्दल इतर वाचनसाहित्याबद्दल, त्यातील आशयाबद्दल, त्यांच्या लेखनशैलीबाबत माहिती मिळविली पाहिजे. वाचनसल्ला देण्यासाठी ग्रंथालय सेवकांनी जाणीवपूर्वक अशी तयारी केली पाहिजे. विशेष करून लहान मुलांनी काय वाचावे याबाबत सार्वजनिक ग्रंथालयांच्या ग्रंथपालांनी मार्गदर्शन केले तर सार्वजनिक ग्रंथालयांची उपयुक्तता आणखी वाढेल. त्यातून त्यांचे सभासद वाढतील, त्यामुळे अधिक अनुदान आणि देणग्या मिळू शकतील.

## विशेष वाचनसाहित्य आणि सेवा

समाजामध्ये अनेक तात्कालिक समस्या निर्माण होत असतात आणि त्या सोडविण्यासाठी संबंधित एजन्सी प्रयत्नही करत असतात. सार्वजनिक ग्रंथालये विशेष वाचनसाहित्य संग्रह विकसित करून आणि विशेष सेवा निर्माण करून तात्कालिक सामाजिक समस्या सोडविण्यामध्ये हातभार लावू शकतात. उदाहरण म्हणून पुढील विषय पाहा– प्रदूषण, स्त्रीभ्रूणहत्या, विज्ञानप्रसार, आरोग्य, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, इत्यादी. हे विषय/ समस्या अशा आहेत की, ज्याबाबत जेवढी जास्त माहिती नागरिकांपर्यंत पोहचेल तेवढे उत्तम. कारण संबंधित समस्येच्या साक्षरतेद्वारेच त्या समस्या दूर करणे शक्य आहे. सार्वजनिक ग्रंथालये जनसंवादाचे माध्यम म्हणून याबाबत व्यापक भूमिका बजावू शकतात. लोकशिक्षणाचे/लोकसाक्षरतेचे माध्यम म्हणून महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. त्यासाठी सार्वजनिक ग्रंथालये दोन कार्य करू शकतात. एक म्हणजे संबंधित विषयाबाबत/ समस्येबाबतचा सर्वोत्तम वाचनसाहित्य संग्रह विकसित करणे. दुसरे म्हणजे संकलित वाचनसाहित्याच्या उपलब्धतेबाबत वाचकांना जागृत करणे. उदाहरणार्थ, हरित ग्रंथालय (Green libraries) संकल्पने अंतर्गत ग्रंथालये प्रदूषणाचे प्रकार, प्रदूषणाची कारणे,प्रदूषण कमी करण्यासाठी वा पूर्णपणे नियंत्रित करण्यासाठीचे उपाय, इत्यादी विषयावरील वाचनसाहित्य संकलित करू शकतात. स्त्रीभ्रूणहत्या ही सध्या एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. या समस्येची तीव्रता स्पष्ट करणारे, यासमस्येबाबत जागरूकता निर्माण करणारे अनेक प्रकारचे वाचनसाहित्य प्रकाशित होत आहे. हे वाचनसाहित्य सार्वजनिक ग्रंथालये जाणीवपूर्वक संकलित करू शकतात. विज्ञान प्रसाराचे कार्य समाजामध्ये कमीत कमी दोन दृष्टीने आवश्यक असते. विज्ञान प्रसारामुळे अंधश्रद्धा दूर करण्यास मदत होते. शिवाय वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करून बाल वैज्ञानिक आणि पर्यायाने वैज्ञानिक निर्माण करता येतात. कोणत्याही देशाला प्रगतीसाठी वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानात्मक विकास आवश्यक असतो. सार्वजनिक ग्रंथालये विज्ञानविषयक विविध प्रकारचे वाचनसाहित्य संकलित करून विज्ञान प्रसारासाठी आणि पर्यायाने देश विकासासाठी मदत करू शकतात. आरोग्यदायी नागरिक ही कोणत्याही देशाची संपत्ती असते. आरोग्याबाबत उपायापेक्षा सावधगिरी फायद्याची असते. सावधगिरी बाळगता यावी यासाठी आरोग्य साक्षरता आवश्यक असते. समाजामध्ये आरोग्य साक्षरता निर्माण करण्यासाठी शासन आणि इतर संस्था प्रयत्न करत असतात. सार्वजनिक ग्रंथालयेही यामध्ये मोलाचे योगदान देऊ शकतात. आरोग्याबाबतचे जास्तीत जास्त वाचनसाहित्य उपलब्ध करून सार्वजनिक ग्रंथालये यामध्ये योगदान देऊ शकतात. वर नमूद केलेल्या विविध समस्यांची चर्चा करणारे भरपूर वाचनसाहित्य ललित साहित्याच्या स्वरूपात



प्रकाशित होत असते. जसे, प्रदूषणाचे, स्त्रीभ्रूणहत्येचे, स्वाईनफ्लू यासारख्या संसर्गजन्य रोगाचे भीषण परिणाम स्पष्ट करणाऱ्या कादंबऱ्या, कथा असू शकतात. त्याचप्रमाणे आवाहनात्मक नाट्यग्रंथ असू शकतात. एवढेच नाही मनाला भिडणाऱ्या आणि सतत स्मरणात राहणाऱ्या कवितांचा संग्रह असू शकतो. बऱ्याच वेळा संबंधित क्षेत्रात अतिशय मोलाचे कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था असतात. या व्यक्ती, संस्था कोणत्याही प्रसिद्धीशिवाय पण प्रचंड मोठे कार्य करत असतात. अशा व्यक्तींचे कार्य त्यांच्या चरित्र ग्रंथाच्या स्वरूपात वा आत्मचरित्राच्या स्वरूपात क्वचित नोंदविले जाते. असे चरित्र आणि आत्मचरित्र ग्रंथ नवीन पिढीसमोर एक आदर्श ठेवतात, त्यांना प्रोत्साहन देतात, मार्गदर्शन करतात. यशस्वी स्त्रियांची, समाजसेवकांची, लोकवैज्ञानिकांची चरित्र आणि आत्मचरित्रे उभारत्या पिढीसाठी अत्यंत मार्गदर्शक असतात.

सार्वजनिक ग्रंथालयांनी प्रचलित सामाजिक समस्यांची चर्चा करणारे सर्व वाचनसाहित्य आवर्जून संकलित करावे. महत्त्वाचे म्हणजे संकलित केलेल्या संबंधित विषयावरील वाचनसाहित्याच्या उपलब्धतेची माहिती संबंधितांना देणेही एवढेच आवश्यक आहे. यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांनी प्रसंगोचित अशी ग्रंथप्रदर्शने भरवावीत. विविध विषयांचे जे दिन साजरे केले जातात (जसे जागतिक मातृत्व दिन) त्या दिवशी संबंधित विषयावरील वाचनसाहित्याचे प्रदर्शन भरवावे. तसेच संबंधित विषयाच्या तज्ज्ञांचे/ अभ्यासकांचे व्याख्यान आयोजित करावे. या आणि इतर मार्गांनी सार्वजनिक ग्रंथालये विविध सामाजिक समस्यांनिवारणामध्ये अप्रत्यक्षपणे अत्यंत महत्त्वाची मदत करू शकतात.

विक्रीसाठी ग्रंथ उपलब्ध करणे, ग्रंथालय (वाचन) प्रतिनिधी (Library representative) तयार करणे, घरपोच ग्रंथसेवा देणे, उन्हाळ्यामध्ये बाल वाचक सभासदाच्या पाहुण्यामित्रासाठी सभासदत्व देणे, लेखन कार्यशाळा आयोजित करणे, इंटरनेटवरील मोफत वाचनसाहित्याचे पोर्टल विकसित करणे यांसारखे अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून सार्वजनिक ग्रंथालये आपली उपयुक्तता सिद्ध करू शकतात.

## समारोप

वरील परिच्छेदामध्ये वर्णन केलेले आणि इतरही उपयुक्त उपक्रम राबविण्यासाठी अनेक सार्वजनिक ग्रंथालये तयार होतील, परंतु यासाठी सार्वजनिक ग्रंथालयाकडे योग्य त्या सोईसुविधा उपलब्ध असल्या पाहिजेत. विशेषतः सार्वजनिक ग्रंथालयांकडे पुरेशी आणि कार्यक्षम इमारत असली पाहिजे. योग्य फर्निचर असले पाहिजे, संगणक आणि इतर संबंधित तंत्रज्ञान उपलब्ध असले पाहिजे, मुख्य म्हणजे प्रशिक्षित, उत्साही आणि ग्रंथालय कार्याला वाहून घेणारा सेवकवर्ग असला पाहिजे. अर्थातच, तो वेतन आणि

इतर सोईसुविधा यांबाबत समाधानी असला पाहिजे. या सर्व गरजांची पूर्तता करता येण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांना पुरेसा निधी उपलब्ध झाला पाहिजे. असा निधी उपलब्ध होण्यासाठी संबंधितांच्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल होणे गरजेचे आहे. शासन आणि इतर जनकल्याणकारी संस्थांनी आणि व्यक्तीने सार्वजनिक ग्रंथालयांवरील खर्चाकडे बोजा म्हणून न पाहता ती एक सामाजिक गुंतवणूक आहे हे लक्षात घेतले पाहिजे. सुदृढ, साक्षर आणि सुसंस्कारीत नागरिक हा या गुंतवणुकीचा परतावा असणार आहे. सार्वजनिक ग्रंथालयातील या गुंतवणुकीतूनच आपण समताधिष्ठित विचाराचा आणि वैज्ञानिक तत्त्वांचा पुरस्कार करणारा, एकमेकांच्या विचाराचा आदर करणारा नागरिक निर्माण करू शकणार आहोत. ज्ञानाधिष्ठित समाज निर्मितीमध्ये सार्वजनिक ग्रंथालये रक्तवाहिन्यांप्रमाणे कार्य करतात. म्हणून नवनवीन उपक्रमांद्वारे या ज्ञानवाहिन्यांना अधिक सक्षम करण्याचा चला आपण निश्चय करू या.



# सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासात राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानची भूमिका

प्रा. श्रीमती कल्पना शामराव सोनवणे
ग्रंथपाल, भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय
चोपडा, जि. जळगाव
Email : kalpanasonawane73@rediffmail.com

प्रा. प्रदीप तुळशीराम पाटील
ग्रंथपाल, अ. यु. क. के संचलित महिला महाविद्यालय, देवपूर, धुळे
Email : ptpatil66@rediffmail.com

*ग्रंथ आणि ग्रंथालयांनी गेली अनेक वर्षे जनजागृतीचे, ज्ञान वाटपाचे कार्य केले आहे. राष्ट्रसंघाने (UNO) सार्वजनिक ग्रंथालयांना दुसऱ्या शाळेची उपमा दिली आहे. यातून लोकशिक्षण व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे, सार्वजनिक ग्रंथालयाने बहिःशाला शिक्षण करावे व लोकांना जीवन शिक्षण द्यावे असे मानले आहे. शेतकरी, करागीर, छोटे-मोठे व्यावसायिक यांना त्यांच्या क्षेत्रातील ज्ञान गावातील सार्वजनिक ग्रंथालयांनी ग्रंथाच्या माध्यमातून द्यावे अशी कल्पना आहे. यातून अनौपचारिक पद्धतीचे शिक्षण दिले जाते. यासाठी सार्वजनिक ग्रंथालय हे लोकविद्यापीठ समजले गेले आहे. तेथे धर्मनिरपेक्ष, लिंगनिरपेक्ष, सर्वांना समान पद्धतीने प्रवेश व मोफत सुविधा करून दिल्या जातात. केंद्र शासनाची राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान ही संस्था अशा सार्वजनिक ग्रंथालयांना इमारत, फर्निचर, साधनसामग्री उपलब्ध करून देणे, विशेष दिन साजरा करणे इ. कारणासाठी प्रस्ताव पाहून खास मदत करीत असते, शिवाय ग्रंथही विनामूल्य देत असते.*

## प्रस्तावना

आपल्या भारत देशाला प्राचीन काळापासून समृद्ध ज्ञानाचा व संस्कृतीचा संपन्न वारसा लाभलेला आहे. भारतात अयोध्या, काशी, कांची, उंदनपुरी, गुणशीला, तक्षशिला, नालंदा अशी प्राचीन विद्यापीठे अस्तित्वात होती. तेथे हिंदू, जैन, बौद्ध अशा विविध धर्माचार्यांच्या हस्तलिखितांचे भांडार होते. तशाच प्रकारची ग्रंथसंपदा आजही सुरुवातीच्या काळातील सार्वजनिक ग्रंथालयांनी जपून ठेवली आहे. आज महाराष्ट्रात ग्रंथालयांची वाटचाल जोमाने सुरू असून शहरापासून ग्रामीण भागापर्यत सर्वत्र सार्वजनिक ग्रंथालये सुरू करण्यात आली आहेत. सार्वजनिक ग्रंथालये हे वस्तुतः ज्ञान वितरणाचे एक श्रेष्ठ माध्यम असून वाचनाचा आनंद मिळवून देणारे एक सांस्कृतिक केंद्रही आहे. नव्या कल्पना, नवे विचार यांच्या प्रचाराचे ते कार्य करीत असते. त्यायोगे जनतेला आपल्या मोकळ्या वेळेचा सदुपयोग करण्याची संधी मिळते. सार्वजनिक ग्रंथालय आपल्या बौद्धिक जीवनाच्या कक्षा विस्तारित करते. आपल्या जीवनात अंर्तबाह्य बदल करून आपल्यात श्रेष्ठ नागरिकत्वाची पात्रता निर्माण करण्याची शक्ती सार्वजनिक ग्रंथालयात आहे. सार्वजनिक ग्रंथालये जनतेने जनतेसाठी काढलेली सार्वजनिक निरंतर शिक्षणाची, स्वयं-शिक्षणाची केंद्रे होणे आवश्यक आहे. समाजातील सर्व स्तरांतील बाल, वृद्धांना आकर्षित करणारी, त्यांना वाचनाची आवड लावणारी व ती वाढविणारी अशी व्हावयास पाहिजेत. सार्वजनिक ग्रंथालयाच्या कार्याचा परिणाम समाजातील आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, राजकीय अशा विभिन्न स्तरांवर जाणवतो. सार्वजनिक ग्रंथालयाद्वारे वाचक सुसंस्कृत झाल्यास सर्व समाज सुसंस्कृत होण्यास मदत होते.

समाजातल्या सामान्यातल्या सामान्य माणसाची वाचनाची भूक भागविणारी आणि त्यांची भूक वाढविणारी सार्वजनिक ग्रंथालये समाजाची मोठी सेवा करीत असतात. सार्वजनिक ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाला वर्गणी, देणगी, किरकोळ जमा होणाऱ्या रकमेतून ग्रंथालये चालविणे कठीण जाते. वाचकांच्या वाढत्या गरजा, ग्रंथ, नियतकालिके, फर्निचर, जागाभाडे, विद्युतपुरवठा इ. च्या वाढत्या किमतीमुळे ग्रंथालये शासनाच्या अनुदानावर अवलंबून असतात. ग्रंथालय चळवळीला पुरेसे अर्थसाहाय्य उपलब्ध झाले नाही तर शिक्षणपद्धती व किंबहुना समाजजीवनावर विपरीत परिणाम होतो. या गोष्टीचा विचार करता राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानने ग्रंथालय विकासाच्या व ग्रंथालय सेवेत सुधारणा व्हावी म्हणून विविध योजना कार्यान्वित केलेल्या आहेत.

## राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानची स्थापना

स्वातंत्र्याचे रौप्य महोत्सवी वर्ष, आंतरराष्ट्रीय ग्रंथ महोत्सवी वर्ष व आधुनिक भारताचे शिल्पकार व सामाजिक सुधारणेचे प्रेरक, मार्गदर्शक राजा राममोहन रॉय यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त देशभर सार्वजनिक ग्रंथालयांचे जाळे पसरवून अशा ग्रंथालयांना मदत व उत्तेजन देऊन देशातील अतिदुर्गम भागापर्यंत वाचनासाठी ग्रंथ पुरवून वाचनाची अभिरुची निर्माण करण्यासाठी प्रतिष्ठानची स्थापना करण्याचे ठरले. त्यानुसार भारत सरकारच्या शिक्षण व समाजकल्याण मंत्रालय कक्षेत असलेल्या सांस्कृतिक कार्य विभागाद्वारे २० मे १०७२ रोजी पश्चिम बंगाल संस्था नोंदणी अधिनियम १९६१ अंतर्गत कोलकता येथे RRRLF ची स्थापना झाली.

### राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानची उद्दिष्टे-

१) देशातील सार्वजनिक ग्रंथालयांना आर्थिक व तांत्रिक साहाय्य करणे.
२) ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन देणे.
३) राष्ट्रीय ग्रंथालय धोरण तयार करणे.
४) आंतर देवघेव पद्धतीने एकात्मिक ग्रंथालय सेवेद्वारे राष्ट्रीय ग्रंथालय पद्धती उभारण्यासाठी सहकार्य करणे.
५) देशातील ग्रंथालय विकासाच्या सर्व दृष्टीने शासनास सल्ला देणे.
६) देशातील प्रत्येक राज्यात ग्रंथालय कायदा लागू करण्यासंदर्भात प्रयत्न करणे.
७) राष्ट्रीय संयुक्त तालिका तयार करणे. (Union Catalogue)
८) भारत सरकारला देशातील ग्रंथालय विकासास आवश्यक असलेल्या सर्व बाबींविषयी मार्गदर्शन करणे.
९) ग्रंथालय विकासात कार्य करणाऱ्या राष्ट्रीय, राज्य आणि विभागीय पातळीवरील संस्थांना अर्थसाहाय्य करणे.
१०) ग्रंथालयासंदर्भातील संशोधनास प्रोत्साहन देणे.
११) सार्वजनिक ग्रंथालयांना आर्थिक व ग्रंथरूपी मदत करणे.
१२) ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, कार्यशाळा, परिसंवाद, सेमिनार यासंदर्भात आर्थिक मदत करणे.

## राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या अर्थसाहाय्याच्या योजना

देशातील सार्वजनिक ग्रंथालये समृद्ध व्हावीत म्हणून प्रतिष्ठान ज्या काही अर्थसाहाय्याच्या योजना राबविते, त्या दोन प्रकारच्या आहेत.

अ) समतुल्य साहाय्य योजना (Matching Scheme)
आ) असमतुल्य साहाय्य योजना (Non-Matching Scheme)

**समतुल्य साहाय्य योजना**

समतुल्य अर्थसाहाय्य योजना म्हणजे शासनाचा जेढा निधी तेवढाच हिस्सा प्रतिष्ठानचा मिळून Matching Fund तयार होतो. समतुल्य अर्थसाहाय्य योजनेचे सूत्र कर्नाटक, महाराष्ट्र, प. बंगाल, यांसारख्या विकसित राज्यासाठी ५०:५०, उत्तर पूर्व राज्य सोडून इतर मागास राज्यांसाठी ६०:४०, उत्तर पूर्व राज्यांसाठी ९०:१०. यात प्रतिष्ठानचा हिस्सा ९०% तर राज्याच्या हिस्सा फक्त १०% इतका होय.

### (१) परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व ग्रंथप्रदर्शने आयोजनासाठी अर्थसाहाय्य

राज्यस्तरीय परिसंवाद, चर्चासत्रे व कार्यशाळा यांच्या आयोजनासाठी जास्तीत जास्त रु. २ लाख अर्थसाहाय्य प्रतिष्ठानकडून प्राप्त होते तर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी, प्रशिक्षण वर्ग राबविण्यासाठी व ग्रंथप्रदर्शनासाठी रु. १ लाख अर्थसाहाय्य, जिल्हास्तरीय प्रशिक्षणवर्गासाठी, ग्रंथप्रदर्शनासाठी, परिसंवादासाठी रु. १ लाख अर्थसाहाय्य तर नवीन संघटनासाठी रु. २०,०००/- अर्थसाहाय्य प्राप्त होते.

### (२) ग्रंथसंग्रह, वाचनसाहित्य व दृक्‌-श्राव्यसाधने वाढविण्यासाठी अर्थसाहाय्य

पुस्तक साहाय्यता योजनेअंतर्गत सर्व श्रेणीच्या (अ, ब, क, ड) सार्वजनिक ग्रंथालयांना ग्रंथसंग्रह, वाचनसाहित्य व दृक्‌-श्राव्य साधने खरेदी करण्यासाठी वाचनसाहित्याच्या स्वरूपात प्रतिष्ठानकडून मदत केली जाते. यात सर्व जिल्हा ग्रंथालये, तालुका ग्रंथालये, ग्रामीण ग्रंथालये, शासकीय विभागीय ग्रंथालये, स्वयंसेवी संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी स्थापन केलेली ग्रंथालये यांना प्रतिष्ठानकडून ग्रंथ स्वरूपात मदत होत असते.

### (३) ग्रामीण ग्रंथसंग्रह केंद्र व फिरती ग्रंथालय सेवा (Mobile Library) वाढविण्यासाठी अर्थसाहाय्य

ग्रामीण व शहरी लोकांना वाचनाचा लाभ मिळण्यासाठी ग्रंथसग्रहकेंद्र व फिरती ग्रंथालय सेवा प्रतिष्ठानमार्फत सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत सायकल, रिक्षा, पुस्तके साठविण्याची पेटी, पिशव्या, ध्वनी विस्तारक यंत्र, मायक्रोफोन, इतर वाचनीय व दृक्‌ साधने खरेदी करण्यासाठी प्रतिष्ठानकडून जास्तीत जास्त रु. ५०००/- चा निधी प्राप्त होतो.



### (४) ग्रंथ ठेवण्यासाठी कपाट व रॅक खरेदीसाठी अर्थसाहाय्य

या योजनेअंतर्गत प्रतिष्ठानकडून ग्रंथ ठेवण्यासाठी कपाटे व रॅक, वॉटर कुलर, पंखा, फर्निचर व टायपिंग मशीन, वाचनकक्ष फर्निचर, कार्ड कॅबिनेट, जनरेटर खरेदी करण्यासाठी प्रत्येक सार्वजनिक ग्रंथालयाला रु. ५०,०००/- एवढा निधी दरवर्षासाठी प्राप्त होतो. ही योजना १९७९-८० पासून राबविली जात आहे.

### (५) सार्वजनिक ग्रंथालयांना शैक्षणिक उपक्रमासाठी टि.व्ही., व्हि.डी.ओ., संगणक खरेदीसाठी अर्थसाहाय्य

सार्वजनिक ग्रंथालयांना ग्रंथ व नियतकालिके याबरोबरच ग्रंथालय सेवेत दृक्‌-श्राव्य साधनांच्या साहाय्याने विविधता यावी यासाठी या योजनेअंतर्गत १ टि.व्ही., व्हि.सी.पी. व ३ संगणक, १ सर्व्हर, युपीएस, १ प्रिंटर व सॉफ्टवेअर, इत्यादी खरेदीसाठी निधी मंजूर केला जातो. ही योजना प्रतिष्ठानमार्फत सन १९८७-८८ पासून राबविली जाते.

### (६) सार्वजनिक ग्रंथालयांना इमारत बांधणी व विस्तारासाठी अर्थसाहाय्य

सार्वजनिक ग्रंथालयांना नवीन ग्रंथालय इमारत उभारण्यासाठी किंवा वापरात असलेल्या ग्रंथालय इमारतीचा विस्तार करण्यासाठी अर्थसाहाय्य देण्यात येते. ही योजना १९८९-९० पासून स्वीकारण्यात आली. या योजनेअंतर्गत राज्यस्तरीय ग्रंथालयासाठी रू. १ कोटी (एकावेळी) तर विभागीय, मंडळ, जिल्हा ग्रंथालयासाठी रू ५० लाख (१० वर्षांतून एकदा) तर उपविभागीय तालुका नगर ग्रंथालयासाठी रू. ५० लाख (१० वर्षांतून एकदा) तर राहिलेल्या ग्रंथालयांसाठी रू. १० लाख एवढा निधी प्राप्त होतो.

● **असमतुल्य साहाय्य योजना**

१) ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अर्थसाहाय्य

२) बालग्रंथालये व सार्वजनिक ग्रंथालयांच्या बालविभागांना अर्थसाहाय्य योजना.

३) ग्रंथालयांचे ५०/६०/७५/१००/१२५/१७५ वर्ष साजरे करण्यासाठी अर्थसाहाय्य

४) केंद्रशासनाने पुरस्कृत केलेल्या ग्रंथालयांना अर्थसाहाय्य

५) राष्ट्रीय स्तरावर चर्चासत्र, परिषदांच्या आयोजनासाठी अर्थसाहाय्य

६) केंद्रीय/मध्यवर्ती ग्रंथनिवड पद्धतीने ग्रंथालयांना पुरेसा ग्रंथसंग्रह वाढविण्यासाठी अर्थसाहाय्य

७) आर आर आर एल एफ चिल्ड्रेन कॉर्नर स्थापन करण्यासाठी अर्थसाहाय्य
८) शारीरिक अपंगत्व आलेल्या वाचकांसाठी अर्थसाहाय्य.
९) उत्तर पूर्व राज्यातील ग्रंथालयांसाठी अर्थसाहाय्य

**● ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना अर्थसाहाय्य**

ही एक असमतूल्य साहाय्य योजना आहे. ही योजना सन १९८५-८६ पर्यंत सांस्कृतिक विभाग, भारत सरकारद्वारा राबविली जात होती. सन १९८६-८७ पासून ही योजना प्रतिष्ठानमार्फत राबविली जाते. या योजनेअंतर्गत ७५ % अर्थसाहाय्य प्रतिष्ठान मार्फत २५% अर्थसाहाय्य संबधित संस्थेला करावे लागते. या योजनेचा उद्देश सार्वजनिक ग्रंथालयांच्या क्षेत्रात पुस्तके, फर्निचर, उपकरणे, ग्रंथालयासाठी इमारत बांधणी व विस्तारासाठीही मदत केली जाते. प्रतिष्ठानमार्फत ग्रंथखरेदी, फर्निचर, उपकरणे व संगणक, जनरेटर, झेरॉक्स मशिन, वॉटर कुलर इ. साठी जास्तीत जास्त रू ३ लाख, ३० वर्षांच्या आतील ग्रंथालयांसाठी रू. ६ लाख तर ग्रंथालय इमारत बांधणीसाठी रू. १० लाखापर्यत मदत मिळते.

**बालग्रंथालये व सार्वजनिक ग्रंथालयाच्या बालविभागांना अर्थसाहाय्य योजना**

ग्रंथालयाद्वारे मुलांमध्ये वाचनाची आवड विकसित करण्यासाठी ही योजना सुरू आहे. या विभागांतर्गत बाल वाचक, महिला वाचक, वरिष्ठ नागरिक, करिअर गाईडन्स इ. विभागांसाठी ग्रंथ, रॅक, बुक केस, रिडींग टेबल, व खुर्च्या खरेदीसाठी प्रत्येक विभागाला रू. ५० हजारापर्यंत अनुदान मंजूर होते, मात्र त्यातील ६० % रक्कम ही ग्रंथखरेदीसाठी वापरावी लागते. मात्र एका वर्षात एका ग्रंथालयाला जास्तीत जास्त रू. १५००००/- एवढेच अनुदान मंजूर होते.

**● ग्रंथालयांचे ५०/६०/७५/१००/१२५/१५०/१७५ वर्षे साजरे करण्यासाठी अर्थसाहाय्य**

सार्वजनिक ग्रंथालयांना स्थापन होऊन तसेच जनतेस ग्रंथालय सेवा देऊन सुवर्ण महोत्सव हीरक महोत्सव, शताब्दी महोत्सव, वगैरे साजरे करण्यासाठी प्रतिष्ठानमार्फत मदत केली जाते. ही योजना १९९०-९१ मध्ये लागू करण्यात आली. या योजनेअंतर्गत ५०/६०/७५ वर्षांसाठी एकावेळेस रू. १ लाख मदत मिळते तर १०० वर्षांपुढील ग्रंथालयांसाठी रू. १ लाख ५० हजार मदत मिळते. याअंतर्गत सेमिनार, वर्कशॉप, ग्रंथखरेदी, संगणक, झेरॉक्स मशिन, रॅक खरेदी, वगैरेसाठी ही रक्कम वापरता येते.



**● केंद्रशासनाने पुरस्कृत केलेल्या ग्रंथालयांना अनुदान**

या योजनेतून भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयांतर्गत युवक सेवा कार्यक्रमासाठी देशातील जिल्हा केंद्र म्हणून नेहरू केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या युवक केंद्रामार्फत शाळेत न जाणाऱ्या १५ ते ३५ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविला जातो. या योजनेअंतर्गत २५,०००/- रुपये ग्रंथ खरेदी, २०,०००/- रुपये फर्नीचर, ग्रंथालय इमारत, संगणकीकरणासाठी ४ लाख रू. अनुदानाद्वारे मदत केली जाते.

**● राष्ट्रीय स्तरावर चर्चासत्र, परिषदांच्या आयोजनासाठी अर्थसाहाय्य**

राष्ट्रीय पातळीवरील ग्रंथालय संघटनाना व्यावसायिक चर्चासत्र किंवा परिषद आयोजित करण्यासाठी प्रतिष्ठान देशात ग्रंथालय चळवळ विकसीत करण्यासाठी चर्चासत्र व परिषदांचे राष्ट्रीय स्तरावर आयोजन करणे यासाठी प्रतिष्ठानकडून जास्तीत जास्त १,०००००/- इतके अनुदान प्राप्त होते. यापेक्षा जर खर्च लागला, तर तो खर्च सदर ग्रंथालयाने करावा असे सांगितले जाते.

**● केंद्रीय/मध्यवर्ती ग्रंथनिवड पद्धतीने ग्रंथालयांना पुरेसा ग्रंथसंग्रह वाढविण्यासाठी अर्थसाहाय्य**

राज्य मध्यवर्ती ग्रंथालये, जिल्हा किंवा इतर प्रतिष्ठानने निवड केलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांना ग्रंथ व वाचनसाहित्य पुरविणे हा या योजनेचा उद्देश आहे. यात ग्रंथांची निवड, खरेदी आणि वितरण प्रतिष्ठानतर्फे केले जाते. यात किती प्रती खरेदी करणार, किती टक्के सवलत दिली जाते याचा तक्ता दिलेला असतो. १ ते १० प्रती १०%, ११ ते २५ प्रती १५%, २६ ते १०० प्रती २०%, १०१ ते २०० प्रती २५%, २०१ ते ५०० प्रती ३०%, तर ५०१ पेक्षा अधिक प्रती ३५% सवलत सदर ग्रंथांवर दिली जाते.

**● आर. आर. आर. एल. एफ. चिल्ड्रेन कॉर्नर स्थापन करण्यासाठी अर्थसाहाय्य**

या योजनेअंतर्गत देशातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या बालविभागांना आर्थिक साहाय्यता देण्यासाठी मदत केली जाते. या योजनेअंर्गत रु. २ लाख इतकी सहायता बालविभागातील ग्रंथ, रॅक, टेबल, खुर्ची, संगणक, इत्यादी खरेदी करण्यासाठी दिली जाते.

## ● शारीरिक अपंगत्व आलेल्या वाचकांसाठी अर्थसाहाय्य

या योजनेचा मुख्य उद्देश ज्या वाचकांना शारीरिक अपंगत्व आलेले असेल अशा वाचकांना प्रवाहात आणण्यासाठी सार्वजनिक वाचनालयांना प्रतिष्ठानकडून अर्थसाहाय्याच्या स्वरूपात मदत होत असते. यात ब्रेल लिपीतील ग्रंथ, कॉम्प्युटर स्क्रीन रिडींग सॉफ्टवेअर उदा. JAWS-10 ऑप्टीकल कॅरेक्ट रिगन्नायझेशन सॉफ्टवेअर (प्रकाशित साहित्य आवाजात परिवर्तन करणे) उदा. Kurzeweil 1000, ऑडिओ, व्हिडीओ कॅसेटस्, इ. यात उपविगीय ग्रंथालयासाठी रु. ५ लाख, जिल्हा ग्रंथालयासाठी रु. ७ लाख तर राज्य केंद्रीय ग्रंथालयासाठी रु. १० लाख निधी प्राप्त होतो.

## ● उत्तर पूर्व राज्यांतील सार्वजनिक ग्रंथालयांसाठी अर्थसाहाय्य

या योजनेअंतर्गत अरुणाचल प्रदेश, नागालँड, मेघालय, आसाम, त्रिपुरा, ओरिसा, इ. उत्तर पूर्व राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांसाठी व आधुनिकीकरणासाठी या योजनेअंतर्गत निधी प्राप्त होतो. यात प्रतिष्ठानचा हिस्सा ९०% तर १०% हिस्सा हा तेथील राज्य सरकारचा असतो.

## निष्कर्ष

देशातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन झालेल्या या प्रतिष्ठानच्या समतुल्य व असमतुल्य अर्थसाहाय्य अशा दोन प्रकारच्या योजनेमार्फत सार्वजनिक ग्रंथालयांना मोठ्या प्रमाणावर अर्थसाहाय्य दिले जाते. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास होण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होत असते. पूर्वीच्या काळी मानसिक संतुलन संभाळण्याचे काम सामान्य माणूसही ग्रंथवाचनाच्या साहाय्याने करीत होता. हे ग्रंथ त्यांना सहजरित्या सार्वजनिक ग्रंथालयात उपलब्ध होत असत. मोठमोठ्या विचारवंतांनी चिंतनातून साकारलेला सुजाणपणा विशेष प्रक्रिया करून सुलभतेने सामान्य माणसापर्यंत  पोहचविण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालये करतात.

## संदर्भ


१. Baruo, B. P. (1993) : Two Decades of the Foundations. Raja Ram Mohan Roy Library Foundation, Kolkata.

२. Chaurasia Kamal Kumar and Yadav Arun Kumar : Raja Ram Mohan Roy Library Foundation (RRRLF) and Public Library Development in India.





३. Raja Ram Mohan Roy Library Foundation (2005) : 34th Annual Report Kolkata, 2005-06.

४. Raja Ram Mohan Roy Library Foundation (2006) : 35th Annual Report Kolkata, 2006-07.

५. Raja Ram Mohan Roy Library Foundation (1997) : Books for the Millions at their Doorsteps, Kolkata, RRRLF.

६. Raja Ram Mohan Roy Library Foundation (2005) : Official Document : Guideliness about Implementing Action Plan for the year 2005-06.

७. बारसे, नारायण (२००२) छ. समर्थ सार्वजनिक ग्रंथालये : समाजाची मानसशास्त्रीय गरज, ज्ञानगंगोत्री, वर्ष ३ (२), सप्टें. - नोव्हें., पृ. क्र. २६-३४.

८. देशपांडे, ए. व्ही. (२०१२) : सार्वजनिक ग्रंथालये आणि समाज, चित्रलेखा वर्ष ३९(९), २५ मे, पृ. क्र. ६२-६३.

९. देशपांडे, श्रीराम (२००१) : महाविद्यालयीन ग्रंथपालांचा सार्वजनिक ग्रंथालय चळवळीत सहभाग, ज्ञानगंगोत्री, वर्ष २ (२), सप्टें.-नोव्हें., पृ. क्र. ६९-७४.

१०. सन्नासे, बी. ए. (२००४), राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान, ज्ञानगंगोत्री वर्ष ५(२) सप्टें.-नोव्हें., पृ.क्र. ४०-७८.

११. वीर, धर्मराज (२००६), राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान, सार्वजनिक ग्रंथालयांसाठी वरदान, ज्ञानगंगोत्री, वर्ष ७(१) जून-ऑगस्ट, पृ. क्र. २९-३६.

# आभासी ग्रंथालय

प्रा. श्रीमती कल्पना शामराव सोनवणे
ग्रंथपाल, भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय
चोपडा, जि. जळगाव
Email : kalpanasonawane73@rediffmail.com

प्रा. प्रदीप तुळशीराम पाटील
ग्रंथपाल, अ.यु.क.के. संचलित, महिला महाविद्यालय, देवपूर, धुळे
Email : ptpatil66@rediffmail.com

*आभासी ग्रंथालय हे ग्रंथालयाच्या अतिमहत्त्वाच्या सेवा आणि संगणक वापरणाऱ्यांच्या भिंतीपलीकडे समीक्षणात्मक संशोधन संग्रह देईल. आभासी ग्रंथालय हे भावी पिढ्यांसाठी संग्रह प्राप्त करण्याचा आणि जतन करण्याचा प्रयत्न करेल. आभासी ग्रंथालय हे विशिष्ट शाखेच्या कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या अस्तित्वात असलेल्या गरजा व नवीन निर्माण होणाऱ्या गरजा पूर्ण करण्यावर प्रकाश टाकते. हे ग्रंथालय विद्यार्थ्यांनासुद्धा नवीन पिढीच्या गरजा पूर्ण करण्याची सेवा देते. आभासी ग्रंथालय हे भविष्यातील ग्रंथालयाच्या संदर्भात एक दृष्टिक्षेप आहे. सदर संशोधन लेखात आभासी ग्रंथालयाची व्याख्या, इतिहास, उद्देश, वैशिष्ट्ये, फायदे व तोटे यांची चर्चा केलेली आहे.*

**प्रस्तावना**

आधुनिक काळातील ग्रंथालय हे माहिती तंत्रज्ञान आणि माहिती व्यवस्थापन शास्त्र यांच्यातील प्रगतीमुळे बदलत्या स्वरूपात सामोरे येत आहे. सुरुवातीस ग्रंथालयात फक्त हस्तलिखिते उपलब्ध असत. मुद्रण कलेचा शोध लागल्यानंतर मुद्रित ग्रंथाची संख्या वाढू लागली. पुढे अनेक नवनवीन माध्यमांचा शोध लागला. त्यात अमुद्रित स्वरूपाची



म्हणजेच मायक्रोफार्मस, चुंबकीय, ध्वनिमुद्रण, चलचित्र, प्रकाशीय व शेवटी इलेक्ट्रॉनिक माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या प्रवाहातील इ-जर्नल, इ-बुक, इ. प्रकाशने, इ-स्त्रोत, इंटरनेट इ. विविध प्रकारांमध्ये माहिती साठविली जाऊ लागली. त्यामुळे सुरुवातीचे छापील साहित्य व आताचे अमुद्रित साहित्य यांच्या संकलनामुळे ग्रंथालयाचे स्वरूप संकरित ग्रंथालय (Hybrid Library) असे होऊ लागले. १९५० नंतर संगणकाचा शोध लागला व ग्रंथालयाचे कार्य यांत्रिक पद्धतीने होऊ लागले. पारंपरिक ग्रंथालयातील संदर्भग्रंथ, दुर्मिळग्रंथ, हस्तलिखिते इ. साहित्य वातावरणाच्या परिणामामुळे खराब व नष्ट होण्याची शक्यता असल्याने त्यावर डिजीटायझेशनची प्रक्रिया करून ते ग्रंथ डिजीटल (अंकीय) स्वरूपात साठविले जाऊ लागले त्यालाच डिजीटल ग्रंथालय (अंकीय ग्रंथालये) असे संबोधतात. पुढे क्षितिजविना ग्रंथालये (Libraries without Boundries) म्हणजेच आभासी ग्रंथालये (Virtual Libraries) जवळजवळ पूर्ण इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचा आभास निर्माण करणारी ग्रंथालये अशी नवीन संकल्पना उदयास आली.

आभासी सत्यता ही मानवाने निर्माण केलेल्या एक किंवा अनेक जाणिवांचे पर्यायी साधन आहे. आभासी सत्यता हे एक प्रकारचे तंत्रज्ञान आहे. जिच्यातील जाणीव वैशिष्ट्यांचा मर्यादित सापेक्ष संबंधामुळे त्या वस्तूशी निगडित असल्याचा अनुभव येतो. प्रगत तंत्रज्ञानामुळे मिळणाऱ्या जाणिवांमुळे सदर सहभागी व्यक्तीस आपण प्रत्यक्षातच वापरत असल्याच्या अभास निर्माण होतो.

वाढत्या उपयोगामुळे आभासी वातावरण उपयोजकाची विश्वसनीयता वाढविते. आभासी ग्रंथालयातून उपयोजकास (user) माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरूपातच उपलब्ध होते. त्यासाठी ग्रंथालयात प्रत्यक्ष जाण्याची आवश्यकता नाही. घरबसल्या नेटवर्कद्वारे आपण ती माहिती उपलब्ध करून घेऊ शकतो. त्यातून उपयोजकाने किती माहिती घ्यावी याची मर्यादा नाही. त्याला ज्या माहितीची गरज आहे ती माहिती तो आभासी ग्रंथालयातून इंटनेटद्वारे आपल्या घरी संगणकावर मिळवू व साठवू शकतो. ही माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असल्याने ती साठविण्यासाठी ग्रंथालयात जास्त जागेची गरज भासत नाही. संगणक व तांत्रिक साधने वापरून माहितीचे व्यवस्थापन करता येते. या देखभालीसाठी कर्मचारीही कमी लागतात, मात्र ते प्रशिक्षित हवेत. या ग्रंथालयाद्वारे उपयोजक हा माहिती त्वरित प्राप्त करू शकतो. या ग्रंथालयात माहितीचा साठा मोठ्या प्रमाणावर असतो. इंटनेटवरील माहिती ही या ग्रंथालयात वेगवेगळ्या विषयांचे डेटाबेसेस तयार करून व्यवस्थितरित्या साठवून ठेवलेली असते. त्यामुळे उपयोजकाचा वेळ वाचण्यास मदत होते.

आभासी ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह हा मुद्रित स्वरूपाचा नसतो. त्यात इ-जर्नल, इ-बुक, डेटाबेसेस, इ-स्वरूपातील नियतकालिकांचा सार, व्यापारी वाङमय, इ-वर्तमानपत्रे इ. स्वरूपातील शासकीय कागदपत्रे, डिजीटल स्वरूपातील साहित्य,वेगवेगळ्या वेबवरील लिंकची सूची इ. अनेक प्रकारचे साहित्य आभासी ग्रंथालयात उपलब्ध असते. आभासी ग्रंथालय पद्धतीचा आदर्श हायपरमिडीयामध्ये निर्माण करता येतो यासाठी हायपर कार्डचा उपयोग करता येतो. श्री. हुक यांनी यासाठी हायपर कार्ड तयार केले. या हायपर कार्डमुळे फ्लोरिडा ग्रंथालय पद्धतीचा (FULS) या माहितीसंचात स्थानिक क्षेत्रातील जाळ्याद्वारे प्रवेश मिळतो. यामध्ये श्री. हुक यांनी संपूर्ण ग्रंथालयात वेगवेगळ्या दृष्टिकोनातून आरेखन केले आहे. त्यामुळे उपयोजक जसजशी माऊसची हालचाल करेल, तसतसा उपयोजकाला स्वतः त्या ग्रंथालयातून फिरत असल्याचा भास होतो.

जगातील पहिले आभासी ग्रंथालय इंटरनेट हे आहे. ते संबंधितांना इ-पाठ आणि माहिती उपलब्ध करून देणे. टिम बर्नर ली यांनी सन १९८१ मध्ये जिनिव्हा येथील सर्न या प्रयोगशाळेत HTML आणि इंटरनेटच्या साहाय्याने आभासी ग्रंथालयाची स्थापना केली. आभासी ग्रंथालयाची संकल्पना अधिक लक्ष वेधत आहे, कारण ते एक इंटरनेटचे सधन माध्यम आहे. काही तंत्रज्ञान मंडळे आभासी ग्रंथालयाला एकमेव, आकलनीय आणि मूल्यवान माहिती देण्याचे जगातील एक स्त्रोत मानतात. हे ग्रंथालय म्हणजे पारंपरिक ग्रंथालयाचे एक अटळ परिवर्तन आहे. आभासी ग्रंथालय हे इतके परिपूर्णत्वाने बनविलेले ग्रंथालय आहे की, ते इंटरनेटद्वारे केव्हाही व जगातील कोणत्याही भौगोलिक ठिकाणाहून वापरता येऊ शकते. या ग्रंथालयात एक विशिष्ट माहिती नसते तर सर्व प्रकारच्या विषयासंदर्भात माहितीचा संग्रह असतो. ग्रंथपालांनी या ग्रंथालयाचा उपयोग गेल्या एका दशकापासून किंवा थोड्या अधिक काळापासून केला आहे. अभासी ग्रंथालयाद्वारे स्थानिक पातळीवर वेगवेगळ्या दर्शकांच्या साहाय्याने विस्तारित केलेली माहिती पुरविली जाते.

## व्याख्या

के. गॅपेन (१९६३) यांनी आभासी ग्रंथालयाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

The concept of remote access to the content and services of libraries and other information resources combining an on-site collection of current and heavily used material in both print and electronic form, with an electronic network that provide access to, and delivery from external worldwide library and commercial information and knowledge sources.



आभासी ग्रंथालय म्हणजे जो काही एखाद्या विषयाचा मजकूर आणि सेवा असतील त्या ग्रंथालयामार्फत दिल्या जाणे. ही माहिती वेगवेगळ्या माहितीसाधनांमधून गोळा केली जाते. ही माहिती छापील व इलेक्ट्रॉनिकच्या माध्यमांतून उपलब्ध होते. या संपूर्ण माहितीचे प्रसारण हे बाह्य जगाच्या जागतिक ग्रंथालय आणि व्यावसायिक माहिती आणि ज्ञान यांच्या साहाय्याने होते.

पॉवेल (१९९४) यांच्या मते

Virtual library as it is a library with little or no physical persence of books, periodicals, reading space or support staff, but are that disseminate selective information directly to distributed library customers, usually electronically.

आभासी ग्रंथालय म्हणजे असे ग्रंथालय की ज्या मध्ये ग्रंथ, नियतकालिकांचे भौतिक अस्तित्व खुपच कमी किंवा जवळजवळ नसल्यासारखे असते. वाचनासाठी असलेली जागा किंवा आधारासाठी असलेले कर्मचारी इ. नाहीत परंतु तरीसुद्धा त्यामध्ये माहिती ही त्या ग्रंथालयाच्या वाचकांना नेहमीच इलेक्ट्रॉनिक साधनांच्या साहाय्याने पुरविली जाते.

विकीपेडीया (२००५)

Virtual library means library without walls. The resources are available in digital format, there is no paper, microforms etc. The resources are locally held or accessed through computer networks.

आभासी ग्रंथालय म्हणजे असे ग्रंथालय की ज्याला भिंती नसतात. या ग्रंथालयाचे स्त्रोत हे इलेक्ट्रॉनिक किंवा डिजीटल स्वरूपात उपलब्ध असतात. या ग्रंथालयात कागद किंवा मायक्रोफॉर्म इ. प्रकारचे साहित्य नसते. या ठिकाणी माहितीचे स्त्रोत म्हणजे संगणकाचे जाळे होय.

## आभासी ग्रंथालयाचा इतिहास

आभासी ग्रंथालय हे अचानकपणे इंटरनेटमधून निर्माण झालेले नाही. त्याचा उदय इ. स. १९६० पासून आहे. या ग्रंथालयाचा उपयोग शैक्षणिक, सार्वजनिक आणि खाजगी ग्रंथालयांसाठीसुद्धा होतो. याचा विस्तार, संघटन आणि व्यवस्थापन हे कित्येक वर्षांपासून आर्थर यांनी केले आहे. गेरार्ड मॅनींग हे अभासी ग्रंथालयाचे पहिले अध्यक्ष होते. स्वर्गीय बर्टट्रड इब्राहीम हे आभासी ग्रंथालयाचा निर्मितीच्या आधी असलेले

संघटक होते. त्यांचा सन २००१ मध्ये वयाच्या ४६ व्या वर्षी अकाली मृत्यु झाला. या वर्षापासून आभासी ग्रंथालयाचा विस्तार होत आहे, जेणेकरून आता या मुख्य ग्रंथालयाशी संलग्नित३०० उपग्रंथालये आहेत.

## आभासी ग्रंथालयाचा उद्देश

आभासी ग्रंथालय स्थापनेचा उद्देश अध्यापन आणि ज्ञानाचा संचय करणे हा आहे. यामध्ये विविध प्रकारच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय माहितीचा समावेश आहे. शैक्षणिक साहित्य, ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्र सेवा ज्याप्रमाणे पारंपरिक पद्धतीने मिळणाऱ्या माहितीचे स्त्रोत हे आभासी ग्रंथालयात आहेत. ही संपूर्ण माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात संकलित केली जाते आणि आभासी ग्रंथालयाद्वारे त्याचे प्रक्षेपण केले जाते.

## आभासी ग्रंथालयाची वैशिष्ट्ये

आभासी ग्रंथालयाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे –

१) माहितीच्या स्त्रोताचे संघटन इलेक्ट्रानिक्सच्या सहाय्याने 3D स्वरूपात केले जाते.

२) प्रलेख इलेक्ट्रॉनिक स्वरूपातच उपलब्ध असतात.

३) कोणत्याही जाळ्यातून प्रलेखात प्रवेश घेता येतो.

४) प्रलेखाची प्रतिप्राप्ती अथवा वितरण मागणीनुसार होते.

५) ग्रंथालयाचे कर्मचारी कोणत्याही भौगोलिक स्थानापासून आभासी ग्रंथालयाद्वारे वाचकांना सेवा देऊ शकतात.

६) वाचनसाहित्याच्या उपयोगासाठी ग्रंथालयात जाण्याची आवश्यकता नाही.

७) प्रलेख त्वरित प्राप्त होऊन वाचकांना वेळ वाचतो.

८) ग्रंथालय सेवा जसे– संघतालिका, ओपॅक, प्रचलित जागरूकता (CAS) निवडक माहिती प्रसारण सेवा (SDI) इ. सेवा संगणकावर उपलब्ध आहे.

९) इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचे शोधन सर्व साधनांमधून परिणामकारकरित्या होते.

१०) ग्रंथालयाद्वारे वाचकांना बुलेटीन बोर्ड, ब्लॉग, इ–मेल, व्हाइस मेल, ऑडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सेवा दिल्या जातात.

११) ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना व वाचकांना नवीन तंत्रज्ञान वापराचे प्रशिक्षण दिले जाते.

१२) आभासी ग्रंथालयास भौतिक अस्तित्व असू वा नसू शकते.

१३) यात माहितीचा जागतिक स्तरावर वेगाने आणि विस्तृत अंतर्भाव होतो.

१४) पारंपरिक ग्रंथालय पद्धतीत या नवीन ग्रंथालयामुळे बदल झालेला आढळतो.



१५) तालिकेत इलेक्ट्रॉनिक साहित्याचा जसा समावेश होतो वेबसाईटचासुद्धा तसाच अंतर्भाव असतो.

१६) आभासी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त भर हा माहितीपर्यंत पोहचण्याचा असतो. केवळ संग्रह करण्यावर नसतो.

शेरवेल (१९६७) यांनी आभासी ग्रंथालयाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगितली आहेत.

१) यामध्ये साक्षेप असे भौतिक संघटन (संग्रह) नसते. (उदा. पुस्तकातील माहिती आपल्याला दिसते परंतु ग्रंथ समोर दिसत नाही.)

२) प्रलेख हे इलेक्ट्रॉनिक्सच्या माध्यमात असतात.

३) एकाच विशिष्ट ठिकाणी प्रलेखांचा संग्रह केलेला नसतो.

४) प्रलेख जेव्हा पाहिजे तेव्हा प्राप्त होऊ शकतात किंवा पाठविले जाऊ शकतात.

५) प्रलेखांचा प्रभावी शोध पद्धतीचा उपयोग यात असतो.

## आभासी ग्रंथालयाचे फायदे

१) आभासी ग्रंथालयातील वाचनसाहित्य इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असल्याने कमी जागेत उभारले जाऊ शकते.

२) वाचनसाहित्य डिजीटल स्वरूपात असल्यामुळे ते त्वरित उपलब्ध होते.

३) आभासी ग्रंथालयातील वाचनसाहित्य इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असल्याने ते इंटरनेटद्वारे कोठुनही प्राप्त करता येते. त्यासाठी ग्रंथालयात जाण्याची आवश्यकता नाही.

४) या वाचनसाहित्यातील माहितीत नवनवीन माहितीचा समावेश असतो.

५) या ग्रंथालयातील वाचनसाहित्य हे इंटरनेटवरून प्राप्त केलेले व डिजीटल स्वरूपातील असते.

६) या ग्रंथालयातील वाचनसाहित्य हे हवे तेवढे डाऊनलोड करता येते व ते कुशलतेने हाताळता येते.

७) वर्गणी भरून कोणासही आभासी ग्रंथालयाचे सभासद होता येते, मात्र त्यासाठी वाचकाकडे संगणक व इंटरनेट कनेक्शन हवे.

८) ग्रंथालय आभासी असल्याने यात ग्रंथ गहाळ होणे व चुकीच्या जागी ग्रंथ लावणे ही समस्या उत्पन्न होत नाही.

९) अभासी ग्रंथालयासाठी फारच मोजक्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची गरज असते.

१०) ग्रंथ बांधणी व त्याची निगा हा खर्च लागत नाही.

## आभासी ग्रंथालयाचे तोटे

या ग्रंथालयाचे जसे फायदे आहेत तसेच काही प्रमाणात तोटेही आहेत.

१) आभासी ग्रंथालयात प्रत्यक्ष ग्रंथ हाताळता येत नसल्याने वाचकांना ग्रंथ वाचनाचा आनंद घेता येत नाही.

२) या ग्रंथालयाच्या वापरासाठी संगणक व इंटरनेटचे कनेक्शन आवश्यक असल्याने इतर गरीब वाचकांना हा खर्च परवडत नाही.

३) जशी ग्रंथातील माहिती सत्यता असते तशी इंटरनेटवर कोणीही माहिती टाकू शकत असल्याने त्या माहितीत सत्यता असेल याबाबत साशंकता आहे.

४) आज मोठ्या प्रमाणावर वाचनसाहित्य हे मुद्रित स्वरूपात असल्याने ते सर्वच साहित्य आभासी ग्रंथालयाद्वारे मिळू शकणार नाही.

## निष्कर्ष

आभासी ग्रंथालय हे इतके परिपूर्णत्वाने बनविलेले ग्रंथालय आहे की ते इंटरनेटद्वारे केव्हाही व जगातील कोणत्याही भौगोलिक ठिकाणाहून दिसू शकते. वाचकांना दूर अंतरावरून आभासी ग्रंथालय हाताळण्यास सोयीस्कर राहील. ज्या पद्धतीने सूक्ष्मदर्शी याचा उपयोग करतो, त्या पद्धतीने या ग्रंथालयाचा वापर करता येईल. आभासी ग्रंथालयात खूप भिन्न भिन्न गोष्टींचा समावेश असू शकतो. यात एक विकल्प म्हणून आभासीपणा निरंतर आणि वाढत्या तंत्रज्ञानात अधिकाधिक अनियंत्रित पर्याय म्हणून उपलब्ध असेल. बहुआयामी इलेक्ट्रॉनिक माहिती केंद्रात आभासी ग्रंथालयाचा विकास घडवून आभासी ग्रंथालये येणाऱ्या नजीकच्या काळातील नवा दृष्टिकोन असेल. आभासी ग्रंथालयाकडून जेव्हा माहिती संग्रह करणे, माहितीची पुनर्उपलब्धता आणि इमेज प्रोसेसिंग तंत्रज्ञानात परीपूर्ण होईल, तेव्हा उपलब्ध माहिती मोठ्या प्रमाणावर चित्रांच्या साहाय्याने (Graphical) उपलब्ध करून देता येऊ शकेल.

## संदर्भ


1. Chiveza, D. S. (2006), The potential for virtual library services to promote teaching and reasearch and reduce the digital divides : a case study of university of malaw.
2. Gapen, K. G. (1993), The virtual Library : knowledge society and the librariay in : L.M. Sauders (Ed), The Virtual Library : vision and realities, p. 1-14, Westport Meckler.
3. Hirwade M.A. and Hirwade A. W. (2004), Virtual Libraries : Challenges for 21st centuary in : C.P. Vishishth and M. P. Satija (Ed.) Library and information Profession in India, Vol. - I, Part II, Reflection and Redemptions Delhi : B. R. Pub. Corp. P. 669-677.
4. Koganurmath, Muttaya (2007), Virtual Library : an overview, 5th International CALIBER 2007, Pubjab University, Chandigarh 08, 10 Feb. 2007, p. 535-542.
5. Patil, Pradip T. and Sonawane Kalpana S. (2013), The Virtual Library : vision and reality, in Journal of Young Librarians Association (JYLA), V 6, p. 49-52.
6. Rajendran L. and Venketeson M. (2004), The Virtual Library and overview in, Indian Journal Information Library and Society, V17, N1-2, Jan-Jun 2004, p. 87-90.
7. Ricio, Holly M (2001) Features The Virtual Library : past, present and future.
8. Schuyler, Michael (1998), The Virtual pop side : on the libraries, like popsicles are vulnerable to power failure.
9. The www Virtual Library : http://virb.org
10. Wikipedia, the free encyclopedia (2005a) Virtual Library : http://en.wikipedia.0.9/wiki/virtual library
11. World Wide Web Virtual Library : Wikipedia.htm
12. www.netugc.com wbsite free online UGC/NET/SET/SLET guide in Library and Information Science.

# ग्रे लिटरेचर

खांडेकर जी. बी.
ग्रंथपाल, नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स
इचलकरंजी - ४१६ ११५
Email : klp.ganesh@gmail.com

*ग्रंथालयामध्ये इतर माहिती स्रोताप्रमाणे 'ग्रे लिटरेचर' हेही माहिती प्रसारणाचे स्रोत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामात उपयोग, रिसर्च/रिसर्च पेपरमध्ये उपयोग, वैद्यकीय क्षेत्रातील माहिती, नवीन लागणाऱ्या संशोधनासंबंधी माहिती तसेच मानके ही व इतर माहिती मिळवण्यासाठी ग्रे लिटरेचरचा वापर केला जातो. वाचकांना, विद्यार्थ्यांना विविध विषयांतील नवनवीन माहिती मिळावी यासाठी वर्तमान घडामोडीसंबंधी माहिती देणारे राजकीय/राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ग्रे लिटरेचर तसेच विज्ञान तंत्रज्ञान, वैद्यकीयविषयक प्रसिद्ध होणारे ग्रे लिटरेचर हे प्रभावी साधन आहे. प्रस्तुत लेखात ग्रे लिटरेचरची व्याप्ती, महत्त्व, प्रकार, वैशिष्ट्ये व ग्रे लिटरेचर प्रकाशित करणाऱ्या संस्था यांबाबत माहिती दिली आहे.*

## प्रस्तावना

सद्याचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. रोजच्या रोज नवनवीन माहितीची निर्मिती होत असते. विविध विषयांतील संशोधनामुळे नवनवीन विषय उदयास येत आहेत. मानवाचे ज्ञान वाढत आहे. माहितीच्या प्रचंड परिस्फोटामुळे मानवाच्या ज्ञानात सतत भर पडत आहे. अशी ही नवनिर्मित माहिती नियतकालिकाच्या/ग्रंथाच्या व तंत्रज्ञानाच्या स्वरूपात वाचकांच्या पुढे येत आहे. ही प्रकाशित माहिती वाचकांच्या व संशोधकांच्यापर्यंत पोहचवण्याचे कार्य ग्रंथालय करत असतात.



ग्रंथालयाद्वारे माहितीची साठवण, त्यावर सोपस्कार व त्याचे वितरणाचे ही प्रमुख कार्य होत असतात. ग्रंथालयात विविध वाचन प्रकारचे साहित्य संग्रहित करण्यात येते. ग्रंथ व ग्रंथेतर साहित्याबरोबरच आधुनिक काळात माहितीतंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे डिजीटल स्वरूपात माहिती उपलब्ध होत असते. बहुतांशी वाचकांना ग्रंथालयातील उपरोक्त साधनाबाबत माहिती असते. तथापि आधुनिक काळात माहिती मिळवणे व तिचा प्रसार करणे याकरिता 'ग्रे लिटरेचर' महत्त्वाची भूमिका बजावत आहे. मुख्यत्वे संशोधक आपआपल्या अभ्यासक्षेत्रात नवनवीन प्रकाशित होणाऱ्या व उपलब्ध होणाऱ्या माहितीबाबत फारच उत्सुक असतात. अशा सर्व संशोधकांना, वाचकांना 'ग्रे लिटरेचर' ची अधिक गरज भासत आहे.

माहितीतंत्रज्ञान आणि इंटरनेटचा प्रचार व प्रसार इतक्या वेगाने होत आहे की, त्यापासून सामान्य माणूस असो, शैक्षणिक क्षेत्र असो, आर्थिक जगत असो वा ग्रंथालये असो, कुणीच दूर नाहीत. जगभरातील इंटरनेटच्या जाळ्यामुळे 'ग्लोबल व्हिलेज' ची निर्मिती झाली आहे. योग्य माहिती योग्य वेळी मिळवणे गरजेचे झाले आहे. त्यामुळे माहितीला मूल्य निर्माण झाले आहे. दररोज वेगवेगळे शोध लागत असतात. तसेच शासनातर्फे शैक्षणिक संस्थांद्वारा उद्योग समूह क्षेत्रात दररोज माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात नवनवीन उपयोजन करण्याचा प्रयत्न होत असतो. ही नवीन आलेली माहिती ग्रंथ स्वरूपात ग्रंथालयापर्यंत अथवा वाचकापर्यंत पोहोचण्यासाठी वेळ लागत असतो. मात्र हीच प्रकाशित झालेली माहिती 'ग्रे लिटरेचर' च्या माध्यमांद्वारे ग्रंथालयांमध्ये, वेगवेगळ्या इंडस्ट्रीजमध्ये जलद पोहोचते व त्या नवीन माहितीचा दैनंदिन कामामध्ये उपयोग करून घेता येतो. संशोधकाच्या संशोधनामध्ये ताजी व अद्ययावत माहिती जलद मिळणे गरजेचे असते, अन्यथा त्याच्या संशोधन कार्यामध्ये नवीन माहितीचा अभाव जाणवू शकतो.

## ग्रे लिटरेचर

आजच्या स्पर्धेच्या युगात स्वाभाविक निरसता व ठोकळबाजपणा याला वाव नाही. किंबहुना नावीन्यपूर्ण व सकस अध्यापन अनुभूती देण्यास जे साहित्य असमर्थ ठरेल त्याचा टिकाव लागणार नाही. या बाबतीत ग्रंथालयीन सेवासंबंधीसुद्धा व्यावसायिक नीती अवलंबणे गरजेचे आहे. सहजासहजी उपलब्ध होणाऱ्या वाचन साहित्यापेक्षाही अधिक काही वेगळे देणारे असे समृद्ध असे 'ग्रे लिटरेचर' उपलब्ध आहे. त्याचा आवाका फार मोठा आहे.

क्रमिक पुस्तके, कथा, कादंबऱ्या, कविता संग्रह, संशोधनात्मक लिखाण असलेली पुस्तके, नियतकालिके अथवा पारंपरिक पद्धतीने लिहिले जाणारे उच्चस्तरीय वाङ्मय मग ते कोणत्याही विषयातील असो त्याची सर्वसाधारण विविध सूचीमध्ये नोंद असते. ती

सूचीय नियंत्रणाखाली असतात. यामध्ये पूर्ण व्यावसायिक दृष्टिकोन असतो. या तऱ्हेने सर्व साहित्य खुले अथवा व्हाईट लिटरेचर या सदरात मोडते. यालाच Conventional Literature म्हणून संबोधले जाते. या उलट अनेक अहवाल, संशोधनपत्रिका, लष्कराशी संबधित माहिती, आराखडे, राजकारणाशी निगडित कागदपत्रे संपूर्णतः गोपनीय असतात. सर्वसामान्य वाचक, ग्रंथपाल यांच्यासाठी असे साहित्य उपलब्ध नसते. अशा प्रकाराला ब्लॅक लिटरेचर असे म्हणतात. या दोन टोकांचा सुवर्णमध्य साधणारा साहित्य प्रकार म्हणजेच ग्रे लिटरेचर Non Conventional Literature होय.

'ग्रे लिटरेचर' या माध्यमातून सरकार, शैक्षणिक संस्था, उद्योग समूह हे आपले प्रकाशन प्रकाशित करत असतात. नवीन आलेली माहिती समाजापर्यंत त्वरित पोहचवण्याचे काम 'ग्रे लिटरेचर' हे माध्यम करते. 'ग्रे लिटरेचर' हे प्रिन्ट व इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रकाशित केले जाते. 'ग्रे लिटरेचर' प्रकाशित करण्यामागे आर्थिक फायदा असतोच असे नाही.

शास्त्रीय 'ग्रे लिटरेचर' मध्ये बातमीपत्र (News letter), वृत्तान्त (Reports), स्थितीदर्शक पत्रके (Fact Sheets), प्रबंध (Thesis), सरकारी दस्तऐवज (Government Documents), बातमीपत्रे (Bulletins) आणि इतर हे सर्व मोफत/ वर्गणी जमा करून किंवा विकण्यासाठी ठेवलेले असतात. हे प्रकाशित करण्यामागे महत्त्वाचा उद्देश म्हणजे नवीन लागणाऱ्या शोधाचे ज्ञान उपजत ज्ञानामध्ये वृद्धी करण्यासाठी तसेच त्यामध्ये बदल करून सुसंस्कृतता आणण्यासाठी 'ग्रे लिटरेचर' चा वापर केला जातो.

## ग्रे लिटरेचरची व्याख्या

1. "Material which might be formally publishd, such as institutional reports. It can be difficult to trace, But the MOPS unit can help"
2. "Working documents, Preprints, Research Papers, Stastical documents and other difficult- to access materials that are not controlled by commercial publishers also spelled Grey Literature"
3. "Non - Conventional Literature (NCL - also called 'Grey Literature'). Comprises scientific & Technical Reports, Patent document, Conference Paper, Internal Report, Govrnment Documents, News letters ,Fact Sheets & Thesis which are not readily available through commercial channels, NCL, specifically does not include normal scientific journals, books or popular publications that are available through traditional commercial publication channels"



## ग्रे लिटरेचरचा अर्थ काही लेखकांनी खालीलप्रमाणे दिला आहे.

P. Auger – ''ग्रे लिटरेचर म्हणजे असा विषय की जो सर्वसामान्य व्यापारी तत्त्वावर चालणाऱ्या या प्रकाशन संस्थेकडून प्रकाशित होत नाही. त्यामुळे त्याबद्दल माहिती मिळणे अवघड होते.''

J. M. Gibb & Philip – ''ग्रे लिटरेचर आणि Non Conventional Literature यामध्ये सर्वसाधारण समानता आढळते. याचे वैशिष्ट्य म्हणजे हे लिटरेचर प्रकाशित झालेच पाहिजे अशी कोणतीही इच्छा नसते.''

A. K. Dasgupta – ''ग्रे लिटरेचर या साहित्याची निर्मिती ठरावीक उद्देशासाठी मर्यादित होते. त्यामुळे व्यापारी तत्त्वावर चालल्यास पुस्तक विक्री केन्द्रातून असे साहित्य उपलब्ध होत नाही.'' तसेच ''अर्ध प्रकाशित साहित्य' अहवाल, अंतर्गत प्रकाशन यासारखे विक्रीसाठी उपलब्ध नसलेले साहित्य''.

## ग्रे लिटरेचरचा इतिहास

ग्रे लिटरेचर या शब्दाला फ्रेंचमध्ये "Literature Grise" German मध्ये "Grau literature" Italian मध्ये "Literature Grigia" असे म्हणतात.

ग्रे लिटरेचरला फार मोठा इतिहास व परंपरा नाही. १३ व १४ नोव्हेंबर १९७८ मध्ये ब्रिटीश ग्रंथालय व युरोपियन समाईक समूह यांच्या संयुक्त विद्यमाने एक परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये सर्वानुमते अशी एक विचारधारा संमत झाली की, रूढमार्गाने प्रकाशित होणाऱ्या साहित्याव्यतिरिक्त असांकेतिकरीत्या बरेच मूल्यवान साहित्य निर्माण होत असते. ज्यावर कोणाचेही नियंत्रण नसते. अशा साहित्य प्रकाराला ग्रे लिटरेचर असे म्हणतात. या परिषदेची फलश्रुती म्हणजे SIGLE (सिगल) System for Information in Grey Litreature ची स्थापना होय. युरोपियन देश यांचे सभासद आहेत. नेदरलँडमधील हेग येथे याचे कार्यालय स्थापन करण्यात आले आहे. प्रत्येक सदस्य राष्ट्रीय केन्द्र असून त्या देशात SIGLE च्या कार्यालयाला तत्संबधी माहिती कळवली जाते. SIGLE च्या डेटाबेसमध्ये अशा रितीने सदस्य राष्ट्रामध्ये उपलब्ध असलेल्या देशांमध्ये ग्रे लिटरेचरची अधिकृत नोंद केली जाते. व इतर राष्ट्रे संगणकाच्या माध्यमातून ती मिळवू शकतात. गरजेनुसार झेरॉक्स प्रत, आंतर ग्रंथालयीन देवघेव,

ऑनलाईन वा तत्सम प्रक्रियेद्वारा अधिकृत मूल्य चुकते करून सदस्य राष्ट्रातील केन्द्रे नोंदणीकृत ग्रे लिटरेचरची प्रत मिळवू शकतात.

## ग्रे लिटरेचरची व्याप्ती

ग्रे लिटरेचरची व्याप्ती फार मोठी आहे. सध्याच्या स्पर्धात्मक युगात विविध क्षेत्रांत काम करणाऱ्यांना अद्ययावत व नेमकी अचूक माहिती मिळवणे अत्यावश्यक बनले आहे. त्याशिवाय या स्पर्धात्मक युगात टिकाव लागणे कठीण आहे व याच अंशी ही गरज ग्रे लिटरेचरद्वारे पूर्ण होऊ शकते. ग्रे लिटरेचरमध्ये व्यक्त केलेले विचार अनेकदा मूलगामी स्वरूपाचे असतात. एखादा विशिष्ट प्रकार व त्यामधील विचार दुसरीकडे कुठेही उपलब्ध नसतो. त्याला अतिउच्च दर्जाचे ज्ञानमूल्य असते. त्या वेळेला दुसऱ्या कुठल्याही पर्यायाचा विचार होऊच शकत नाही. या दृष्टीने ग्रे लिटरेचरला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे. सध्याच्या आधुनिक युगात ज्ञानावर आधारित समाज व्यवस्था हा एक महत्त्वाचा घटक बनला आहे. समाजातील व पर्यायाने देशातील सर्वच क्षेत्रांत प्रगती होऊ द्यायची असेल तर सातत्याने विविध विषयांवरील अद्ययावत माहितीचा वेध घेणे व त्यांचा योग्य वापर करणे गरजेचे बनले आहे. पारंपरिक पद्धतीपेक्षा अपारंपरिक पद्धतीने ज्ञानाचा स्त्रोत अविरतपणे चालू आहे. आज निर्माण होणारी माहिती दुसऱ्या दिवशी जुनी झालेली असते. त्यामुळे ग्रे लिटरेचरला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पारंपरीक ग्रंथसमूहाच्या जोडीला ग्रे लिटरेचरमार्फत होणाऱ्या माहितीचे वितरण जरुरीचे आहे.

ग्रे लिटरेचरबाबत "The Unsung Hero, The Foot Solider, The Foundation of the Building" असेही म्हटले जाते.

## ग्रे लिटरेचरची वैशिष्ट्ये

१) हे साहित्य असमन्वेषक (Unexploted) आहे.
२) हे साहित्य पुस्तक विक्रेत्याकडे सुलभतेने उपलब्ध होत नाही.
३) या साहित्यावर सूचीय नियंत्रण नाही.
४) या साहित्याचे निश्चित स्वरूपात वर्गीकरण करता येत नाही.
५) या साहित्य विषयाचे तपशील, उपलब्धता जाणून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात.
६) एकाच तऱ्हेच्या बाह्य स्वरूपात ते कायमस्वरूपी राहील याची शाश्वती नाही. किंबहुना बदलते स्वरूप हाच त्याचा स्थायिभाव आहे.



७) या साहित्य प्रकारामधून चर्चिले जाणारे साहित्य नवीनतम व आसपास बदलत जाणाऱ्या घटनाक्रमांचा वेध घेणारे असतात.
८) बरेचदा प्रयोगशाळेत, संस्थेत याची निर्मिती होते. तेवढ्या मुदतीच त्याची उपलब्धता मर्यादित राहते.
९) असे साहित्य गुणात्मकदृष्ट्या दर्जेदार असले तरी संख्यात्मकदृष्ट्या ते अत्यल्पच असते.
१०) असे साहित्य ओळखणे, संग्रह करणे व वापर करणे यामध्ये अडचणी येतात.

ग्रे लिटरेचरची वैशिष्ट्ये पाहता पूर्णपणे माहिती, प्रसारणामध्ये योग्य ती मदत या माध्यमाद्वारे होत नाही. सर्वसामान्यपणे या साहित्याचा विचार करता ग्रे लिटरेचरबद्दल अनुत्सुकता, मर्यादित वितरकता व उपार्जनातील अडचणी या व इतर अनेक कारणांनी ग्रंथपालांच्या दृष्टिकोनातून ग्रे लिटरेचरचे महत्त्व कमी लेखले जाते. त्यामुळे देशांचा सर्वांगीण विकास होण्यात दिरंगाई होते.

या सर्व घटकांचा विचार करून ग्रे लिटरेचरच्या साहित्यामध्ये आकर्षकता निर्माण करून जर ते समाजामध्ये पसरविले, तर देशाचा सार्वांगीण विकास होण्यास वेळ लागणार नाही. ग्रे लिटरेचरबद्दल समाजमध्ये ग्रंथालयांनी जागरूकता निर्माण केली पाहिजे.

## ग्रे लिटरेचरचे प्रकार

1. Reports
   - Comittee Reports
   - Pre Prints
   - Preliminary Progress & Advanced Reports
   - Institutional Reports
   - Internal Reports
   - Technical Reports
   - Statistical Reports
   - Research Memoranda
   - State of the Art Report
   - Market Research Report
   - Report of Commission & Study Group
   - Occsassional Report
   - Annual Report
2. Thesis
3. Conference Processing
4. Technical Specification & Standards

5. Translations (Not Distributed Commercially)
6. Bibliographies
7. Technical & Commercial Documentation (e.g. Space Shuttle)
8. Official Documents
9. Government Documents
10. Business Document
11. Fact Sheet
12. Standards
13. Patents
14. Working Paper
15. News Letters
16. White Papers
17. Symposia (caca-a)
18. Bulletins
19. Statastical Data
20. Training Material
21. Pamphlet
22. Personal Correspondence
23. Unpublished Works

## ग्रे लिटरेचरचे महत्त्व

जगातील होणाऱ्या शास्त्रीय व तंत्रज्ञानातील संशोधनामध्ये भारताचा तिसरा नंबर लागतो. सद्या भारतामध्ये २९०० हून अधिक संशोधन व प्रगती केन्द्रातून संशोधन चालू असते. यातील प्रत्येक संस्थेच्या वेगवेगळ्या प्रयोगशाळा आहेत. यामध्ये ३१० विद्यापीठे ७३,००० हून अधिक शिक्षक ६०, ५१६ हून अधिक संशोधक ८,१६,३५५ हून अधिक पदव्युत्तर व ७८,६२,५८८ हून अधिक पदवीधर आहेत. ५० करोड हून अधिक रक्कम ही संशोधनावरती खर्च केली जाते. भारतातील ३००० ते ४००० दक्ष संशोधक आपले संशोधन देशातील बहुसंख्य प्रयोगशाळांमधून करतात. अशा संस्थांमधून ते सतत चालू असणाऱ्या संशोधनातून नवीन येणाऱ्या संकल्पना, शोध, कल्पना, विचार, अंतर्गत संशोधन प्रकाशित करत असतात. प्रसिद्ध होणारी माहिती भरपूर महत्त्वाची असते. निरीक्षणे तसेच संशोधनातून निघणारी ठळक माहितीही मिळत असते. ही प्रसिद्ध होणारी प्रकाशने ही फक्त या संस्थाच प्रकाशित करत असतात. अन्यत्र कोठूनही अशा प्रकारची माहिती प्रसारित होत नाही.



ग्रे लिटरेचरमुळे संशोधकांना संशोधनातील प्रत्येक घटकावरील माहिती मिळते. याचा प्रचार व प्रसार जलद गतीने ग्रामीण व शहरी भागामध्ये व मागासलेल्या घटकांमध्येही होतो. ग्रे लिटरेचर हे माहिती मिळविण्याचे महत्त्वाचे साधन आहे. हे साहित्य विद्वान लोकांनी प्रसिद्ध केलेले नसून संशोधकांनी व प्रशिक्षणार्थींनी तात्त्विक प्रयोगाअंती प्रसिद्ध केलेले साहित्य असते. हे साहित्य लवकर प्रकाशित व प्रसारित होते. तसेच भौगोलिक मर्यादा न येता इतर साहित्यापेक्षा विस्तृतपणे प्रकाशित होते.

ग्रे लिटरेचरमधून सर्व विभागांतील ज्ञान वितरित होत असते. वेगवेगळ्या प्रवाहांतील लोकांना, संशोधकांना यांच्यामार्फत ज्ञान प्राप्त होत असते. सर्व शाखांमधील संशोधक तसेच सर्व नियोजनकर्ते सर्व पॉलिसी निर्माण करतात, सर्व सल्लोपदेशक व सर्व शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञसुद्धा बदलाबाबत अद्ययावत असतात. ग्रे लिटरेचरचे लेखक किंवा सामुदायिक संस्था सदरचे बदल निर्देशनास आणुन देतात. महितीच्या जलद प्रसारणामध्ये प्राथमिक संबंध दोहोचाही आहे. एक तर ग्रे लिटरेचरचे निर्माणकर्ते व वापरकर्ते त्यामुळे ताजी माहिती सतत प्रसारित होत असते. उत्पादक, व्यवस्थापक, उपयोगकर्ता यांचे माध्यमातून ग्रे लिटरेचरची उपयुक्तता दिसून येते.

चालू काळामध्ये प्रसारित होणारे भरपूर लेख हे इंटरनेटवरतीच प्रसारित होतात. कारण त्याची इंटरनेटवरून माहिती शोधणे फार सोपे झाले आहे. वेब अॅड्रेस माहीत असेल तर किंवा माहिती सर्च करून शोधता येते. त्यामुळे दुर्दैवाने मुद्रित ग्रे प्रकाशने तसेच काही इलेक्ट्रॉनिक डॉक्युमेंट शोधणे अवघड झाले आहे.

## ग्रे लिटरेचर कलर कोड

ग्रे लिटरेचर ओळखण्याचे काही कलर कोड आहेत.

१) इंजिनियरींग ड्रॉईंग्ज व आर्किटेक्ट प्लॅन्ससाठी निळ्या रंगाचे प्रिन्टस् वापरतात.

२) टेलिफोन डिरेक्टरीमधील जाहिराती, प्रॉडक्ट व सर्व्हीसेससाठी जे पेज वापरले जाते त्याला यलो पेजेस म्हणतात.

३) सहकारी खात्यामधील प्रकाशित होणारे सर्व साहित्य हे व्हाइट पेपरवरती प्रकाशित होते.

ग्रे लिटरेचरचे साहित्यसुद्धा वेगवेगळ्या प्रकारांमध्ये विभागले आहे. यामध्ये आकार, विषय रचना अनुकूल आहेत. यामधील विशेष म्हणजे Black & White या दोन घटकावरती ग्रे लिटरेचरचे प्रकार आहेत.

## पिंक लिटरेचर (Pink Literature)

एकदा माहिती प्रसारित झाली की ती माहिती Black Literature आहे अथवा White Literature आहे हे कोणी पाहत नाही. माहिती वितरित होत असताना फक्त माहितीमधील तुलना, संरक्षण, स्वातंत्र्य व वर्गीकरण, यांमध्ये फरक करता यावा यासाठी कलरचा वापर असतो. उत्पन्न होणारी माहिती अथवा साहित्य जन्मजातच रेड अथवा व्हाईट नसते. पिंक लेटरेचर विभागाची सुरुवात नुकतीच झालेली आहे. माहितीच्या उपर्जनातील निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी पिंक लिटरेचरची निर्मिती केलेली असते.

## Grey लिटरेचर व White लिटरेचर यांमधील फरक

| Criterion | Grey | White |
|---|---|---|
| Relative Volume | Increasing | Decreasing |
| Speed of Production & Delivery | High | Low |
| Cost of Information | Low, Decreasing | High, Increasing |
| Acessbility | Limited, Restricted | Global, Unrestricted |
| Quality Control | To be provided by Innovative Tech | Organised through Traditional Preview Process |
| Long Term archiving | Problematic due to volume and Technological ageing | Problematic due to legal restrictions and Technological ageing |
| Role of libraries | Loss of traditional role, opportunities for new services | Limited by legal restrictions |
| Role of Publisher | Marginal, Limited to support functions | Diminishing |



## ग्रे लिटरेचर विस्ताराचे घटक

१) सतत होणारी ज्ञानबुद्धी
२) नक्कल करण्याच्या आधुनिक पद्धती
३) दूर संभाषण

सतत प्रकाशित होणाऱ्या ग्रे लिटरेचरमुळे ते सादर करण्यासाठी ग्रंथपालांना, माहिती अधिकाऱ्यांना, दस्तऐवज विशेषज्ञांना अनेक अडचणी येत आहेत. यामध्ये वाचक, उपभोक्ते व इतर लोकांना त्याच्याबद्दल माहिती देणे अवघड झाले आहे, कारण हे सतत प्रकाशित होणारे साहित्य नाही.

## ग्रे लिटरेचर प्रकाशित करणाऱ्या संस्था

१) Association - विचार संगत मंडळ
२) Churches - ख्रिस्ती देऊळ
३) Libraries - ग्रंथालये
४) Museums - संग्रहालये
५) Educational Establishments - शैक्षणिक आस्थापना
६) Federations - संघटना
७) Government Departments - सरकारी खाती
८) Institutions - संस्था
९) Laboratories - प्रयोगशाळा
१०) Pressure Group - दवाब समूह
११) Private Publisher - खाजगी प्रकाशक
१२) Research Establishments - संशोधन अस्थापना
१३) Societies - संस्था
१४) Trade Unions - व्यावसायिक/उद्योग संघटना
१५) Trusts - न्यास
१६) Universities - विद्यापीठे
१७) Corporations - महानगरपालिका
१८) Professional Organization - व्यावसायिक संस्था

तसेच असे काही प्रकाशन संस्था कॅटलॉग प्रसिद्ध करत असतात. तसेच काही संस्था आमंत्रण पत्र छापून कलेक्शन सेंटरला भेट देण्यासाठीही प्रसिद्ध करत असतात.

## ग्रे लिटरेचरचे काही नवीन घटक

संशोधनामध्ये अथवा कोणत्याही घटनेमध्ये माहिती योग्य वेळी व योग्य माहिती मिळवणे गरजेचे असते. जगामध्ये उपलब्ध असलेल्या माहितीमधून योग्य ती माहिती शोधून काढावी लागते. १९६० च्या दरम्यान ग्रे लिटरेचरच्या साहित्याची ओळख व तालिकीकरण व टेक्नीकल रिपोर्ट करणे अवघड होते. यांच्यातील ग्रे लिटरेचरच्या नवीन अवतारामुळे ते शोधून काढण्यासाठी काही नवीन घटक खालीलप्रमाणे–

1) LIST SERVs, 2) Bulletin Boards, 3) FTP sites, 4) Know bots, 5) Government Information Locators (GILS), 6) Gopher servs, 7) Word Wide Web, 8) Veronics

वरील घटकाद्वारे ग्रे लिटरेचरमधील येणाऱ्या नवीन माध्यमाचा शोध घेणे तसेच सूचीय नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. प्रत्येक विषयातील निघणारे ग्रे लिटरेचर प्रसिद्ध होऊन वाचकापर्यंत येण्यासाठी जो वेळ लागतो. त्याच्या ऐवजी इंटरनेटद्वारेच प्रकाशित केले जाते. प्रत्येक विषयातील भरपूर वेबसाईट आहेत. ज्याद्वारे वेगवेगळे ग्रे लिटरेचर प्रसारित होत असते. उदाहरणार्थ,

1) Book Shops, 2) Exhibition, 3) Professional Friend, 4) Colleagues, 5) The advertisement in the mass media & Technical Literature, 6) Form of Reviews

प्रगत वापरकर्त्याला खालील गोष्टींची ओळख करून देणे.

१) माहिती पद्धती प्रमुखत्वाने प्रकाशित करणारे ग्रे लिटरेचर

२) सुचींची सूची व सार नियतकालिके प्रकाशित करणारे ग्रे लिटरेचर

३) ग्रे लिटरेचरचे विशेष प्रकार

उदाहरणार्थ, Reports, Conference Literature, Business Documents, Patenrts, etc.

यामधून वापरकर्ता ठरवेल की कोणत्या साधनाचा वापर करून माहितीचा वापर ग्रे लिटरेचर व ॲक्सेस करू शकेल.

## सारांश

ग्रंथालयामध्ये इतर माहिती स्रोताप्रमाणे 'ग्रे लिटरेचर' हेही माहिती प्रसारणाचे स्रोत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामात उपयोग, रिसर्च/रिसर्च पेपरमध्ये उपयोग, वैद्यकीय क्षेत्रातील माहिती नवीन लागणाऱ्या या संशोधनासंबंधी माहिती तसेच मानके ही व इतर माहिती मिळविण्यासाठी ग्रे लिटरेचरचा वापर केला जातो. पारंपरिक



माध्यमापेक्षा माहितीचे विस्तारण जलद होत असते. आधुनिक काळात माहिती मिळवणे व प्रसार करण्याकरीता 'ग्रे लिटरेचर' ही महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

## संदर्भ

1. Tella, R. D. Page No. 4, Access Use of Grey Literature in Social Science, New Delhi, Ess Ess Publication.
2. डॉ. सौ. गोखले, प्रतिभा, पृष्ठ क्र. ३१, ज्ञानगंगोत्री : सप्टें.–ऑक्टो.–नोव्हें. २००१, ग्रे लिटरेचर, नाशिक
3. Information World Review, 1996, What is Grey Literature ? (Online) Available From http://info.learned.co.uk/li/newswire/196.html
4. Manus, T.F. 1996, Grey Literature ? (Online) Avaliable From http://www.greynet.orgpages/3/index.html Grey Literature? (Online) Available from http://www.greynet.orgpages/3index.html www.lib.gla.ac.uk/wlcome/jargon.html
5. Dahibhate, N. B., 2005-06, Grey literature Concepts, Scope & Bibliographic organization Unpublished dissertation, University of Pune, India.
6. साने, भा. ज., २०००, पृष्ठ क्र. १६, ग्रंथालय माहिती, संगणकविषयक परिभाषा कोश इंग्लिश मराठी, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.
7. Tella, R. D., 2006, Page No. 37-38, Access Use of Grey Literature in Social Science, New Delhi, Ess Ess Publication.
8. Tripathi, Manorama, 2006, Open Access to Grey Literature : Challenges & Oppourtunities at the Banars Hindu University in India, Grey Journal, Vol. No. 2.
9. Owen, J. M. (1997), The Expending of horizon of Grey Literature in Proceeding of the 3rd Internatinal Conference on Grey Literature Amsterdam : Transatlantic.
10. Augar, Charles, P., 1989, Page No. 177, Information Sources in Grey Literature, London, Bowker, Saur
11. Posnett, N. W., 1984, Page No. 275, Factors, Affecting the accessibility of non conventional literature for use the united kingdom & some possible solutions, United Kingdom.

12. Vilma, Alberani, B. A. 1985, The use of Grey Literature in health Science : A Primary Survey, Unpublished Dissertation, Bull Med Lib Association, Rome.

13. Wood, D. N., 1984, Collection, Bibliographical Control Access, IFLA Journal, Vol. 10(3) 278-283 p.



# ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्राचे मूल्यमापन करताना विचारात घ्यावयाचे निकष

श्रीमती नीता पांडुरंग पाटील
ग्रंथपाल, विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर
Email : neetapatil100@gmail.com

डॉ. नमिता बाबासाहेब खोत
विद्यापीठ ग्रंथपाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email : nbk.ul@unishivaji.ac.in

*ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्राचे मूल्यमापन करणे ही आज काळाची गरज बनली आहे. ग्रंथालयांच्या उद्दिष्टांच्या संदर्भात आणि मान्यताप्राप्त परिणामांच्या आधारे ग्रंथालयातील योजना आणि उपक्रम यांचे मूल्यमापन करावे लागते. ग्रंथालय आणि माहितीस्त्रोत केंद्राचे मूल्यमापन करताना कोणते निकष विचारात घ्यावे लागतात याची चर्चा सदर लेखात केली आहे.*

**Key Words :** मूल्यमापन, ग्रंथसंग्रहाच्या मूल्यमापनाचे निकष, सेवांचे मूल्यमापन, संगणकीकरणाचे मूल्यमापन, वाचकांचे मूल्यमापन, मूल्यमापनाचे सूत्र नॅकची श्रेणी, नॅकने ग्रंथालयासंबधी ठरवलेली सूत्रे

## १) प्रस्तावना

व्यवस्थापनशास्त्रातील महत्त्वाचा भाग म्हणजे संस्थेचे, तिच्या कार्याचे आणि ती देत असलेल्या सेवांचे मूल्यमापन. मूल्यमापनाचे सर्वसाधारण उद्दिष्ट संस्था योग्य मार्गावर आहे की नाही हे पाहणे, नसल्यास ती कोठे कमी पडत आहे याचा शोध घेणे आणि वेळेवर योग्य त्या उपाययोजना करणे ही आहेत.

ग्रंथालयांच्या उद्दिष्टांच्या संदर्भात आणि मान्यताप्राप्त परिणामांच्या आधारे ग्रंथालयातील योजना आणि उपक्रम यांचे मूल्यमापन, मूल्यमापनाचे सर्वसाधारण उद्दिष्ट संस्था योग्य मार्गावर आहे की नाही हे पाहणे, तसे नसल्यास ती कोठे कमी पडत आहे

याचा शोध घेणे आणि वेळेवर योग्य त्या उपाययोजना करणे ही आहेत.

ग्रंथालयांच्या उद्दिष्टांच्या संदर्भात आणि मान्यताप्राप्त परिणामांच्या आधारे ग्रंथालयातील योजना आणि उपक्रम यांचे मूल्यमापन करावे लागत असते. मूल्यमापनात ग्रंथालयाने हाती घेतलेल्या एखाद्या नावीन्यपूर्ण उपक्रमात किती प्रगती केली आहे, हे आणि ग्रंथालय त्याद्वारे उद्दिष्टपूर्तीच्या किती जवळ आले आहे अथवा अजून उद्दिष्टपूर्ती किती दूर आहे याचे परिणामांच्या साहाय्याने मोजमाप केले जाते. लॅकॅस्टर यांनी मूल्यमापनाचे तीन प्रकार स्पष्ट केले आहेत.

१) सर्वसाधारण परिणामकारक

२) येणारा खर्च आणि परिणामकारकता

३) खर्च आणि त्यापासून मिळणारे फयदे

## २) ग्रंथालय मूल्यमापन संकल्पना

१) संस्था निर्माण करण्यामागील मूळ हेतू त्याकरिता निर्माण केलेल्या साधनांचा योग्य वापर करून साध्य होत आहेत की नाही याची शास्त्रीय पद्धतीने ठरावीक कालांतराने पाहणी करणे व त्यात काही त्रुटी आढळल्यास त्यावर उपाययोजना सुचविणे या प्रक्रियेस मूल्यमापन म्हणतात.

२) ग्रंथालयात योजना व कार्यक्रम यांचा उद्देश प्राप्त करण्यासाठी आणि त्यांच्या यशाचा किंवा अपयशाचा पद्धतशीर पुरावा मिळवण्यासाठी केला जाणारा अभ्यास म्हणजे मूल्यमापन होय.

मूल्यमापनाचे उद्दिष्ट, संस्था योग्य रितीने चालावी व सदैव प्रगतीच्या मार्गावर असावी हे आहे. ग्रंथालयाच्या संदर्भात मूल्यमापनाची संकल्पना ही प्रथम माहिती प्रतिप्राप्तीच्या तंत्राबाबत आली. वर्गीकरण, तालिकीकरण, सूचीकरण इ. अनेक प्रतिप्राप्तीच्या तंत्रांची सक्षमता तपासण्याकरिता मूल्यमापनाची कल्पना पुढे आली.

### ग्रंथालयाचे मूल्यमापन

**१) ढोबळ मूल्यमापन**

१) ग्रंथालयीन सेवा कशी देतात

२) ग्रंथालयाचे कार्य

३) ग्रंथालयाकडून समाजास योगदान

**२) सखोल मूल्यमापन**

अ) ग्रंथालयांचे व्यवस्थापन

१) ग्रंथखरेदी

२) ग्रंथउपस्कार

३) ग्रंथदेखभाल

४) कर्मचारी वर्ग

५) ग्रंथालयांचे आर्थिक मूल्यमापन



आ) ग्रंथालयांच्या सेवांचे मूल्यमापन

१) देवघेव

२) संदर्भसेवा

३) माहिती सेवा

४) वर्गीकरण व तालिकीकरण सक्षमता

५) ग्रंथसंग्रहाची गुणवत्ता

६) ग्रंथउपार्जनाची धोरणे

## ३) ग्रंथसंग्रहाचे मूल्यमापन

ग्रंथालय सेवा देण्यास ग्रंथसंग्रह ही पायाभूत गोष्ट आहे. ग्रंथसंग्रह या संज्ञेत इतर वाचनसाहित्याचाही समावेश होतो.

**ग्रंथसंग्रहाच्या मूल्यमापनाचे निकष**

१) ग्रंथांची संख्या

२) ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांवर वाचन साहित्य

३) अद्ययावतपणा

४) ग्रंथखरेदीचे वार्षिक अंदाजपत्रक

५) ग्रंथांचे स्वरूप

६) मान्यवर संशोधकांचा ग्रंथसंग्रह

७) मान्यवर लेखकांची हस्तलिखिते

८) मातृसंस्थेची सर्व प्रकारची प्रकाशने

९) दुर्मिळ छायाचित्रे

१०) ध्वनिमुद्रिका

११) दुर्मिळ ग्रंथ

**३.१ ग्रंथांची संख्या**

ग्रंथांची संख्या हे ग्रंथसंग्रहाचे एक वैशिष्ट्य आहे. ग्रंथसंग्रह जेवढा जास्त तेवढे ग्रंथालयाचे मूल्य जास्त.

**३.२ ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांवर वाचनसाहित्य**

ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांवर वाचनसाहित्य असणे हे सार्वजनिक ग्रंथालयांचे सुलक्षण तर पितृसंस्थेला महत्त्वाच्या असलेल्या विषयांवर ७५ टक्के, अनुषंगिक विषयावर २० टक्के

आणि इतर विषयांवर ५ टक्के असे प्रमाण आदर्श आहे. उदाहरणार्थ,

१) सर्वमान्य झालेले आद्यग्रंथ

२) त्या त्या क्षेत्रतील सुप्रसिद्ध व्यक्तींनी लिहिलेले सर्व धार्मिक ग्रंथ – भगवतगीता, ज्ञानेश्वरी

३) त्या त्या क्षेत्रातील सुप्रसिद्ध संस्थांनी प्रस्तुत केलेले प्रकाशित व अप्रकाशित साहित्य

४) संबंधित देशांनी, त्यांच्या सरकारने प्रसिद्ध केलेले साहित्य

५) नियतकालिक विभागात – सुसंस्कृत वाचक सदैव वाचतात अशी सर्वसाधारण साप्ताहिके, पाक्षिके वा मासिके, अग्रगण्य मानली गेलेली नियतकालिके.

६) मान्यवर संस्थांनी मान्य केलेली नियतकालिके

७) अद्ययावत माहिती पुरविणारे त्या त्या विषयातील नियतकालिके उदाहरणार्थ, शिक्षण क्षेत्राशी संबंधित – शिक्षण संक्रमण – जीवन शिक्षण

८) ज्ञानकोश, शब्दकोश, वार्षिके

९) इतर वाचनसाहित्य – नकाशे, तांत्रिक अहवाल, वर्किंग पेपर्स, पेटंट मानके, दोलामुद्रिते यांचे प्रमाण व यांची उपलब्धता आणि अद्ययावतता

१०) अमुद्रित संग्रहामध्ये चित्रफिती, ध्वनिफिती, सूक्ष्मफिती

**३.३ अद्ययावतपणा**

ग्रंथालयात असणारा ग्रंथसंग्रह अद्ययावत असणे आवश्यक आहे.

**३.४ ग्रंथखरेदीचे वार्षिक अंदाजपत्रक**

ग्रंथखरेदीचे वार्षिक अंदाजपत्रक किती आहे व किती ग्रंथ दरवर्षी खरेदी केले जातात का ते पाहणे

**३.५ ग्रंथांचे स्वरूप**

ग्रंथालयात ग्रंथ कोणत्या स्वरूपाचे विकत घेतले जातात ते पाहणे.

**३.६ मान्यवर संशोधकांचा ग्रंथसंग्रह**

**३.७ मान्यवर लेखकांची हस्तलिखिते**

ग्रंथालयात मान्यवर लेखकाची हस्तलिखिते असावीत.

**३.८ मातृसंस्थेची प्रकाशने**

ग्रंथालयात मातृसंस्थेची सर्व प्रकारची प्रकाशने असावीत.



**३.९ दुर्मिळ छायाचित्रे ध्वनिमुद्रिका**

दुर्मिळ छायाचित्रे, ध्वनिमुद्रिका याचबरोबर अत्यंत दुर्मिळ असे ग्रंथही संग्रहात असणे हे ग्रंथसंग्रहाच्या उच्च दर्जाचे पैलू आहेत.

## ४) ग्रंथालयीन सेवांचे मूल्यमापन




**४.१ सेवांची संख्या आणि व्याप्ती**

ग्रंथालयात देवघेव, वाचनकक्ष, मुक्तद्वार पद्धती, संदर्भसेवा, माहितीसेवा, भाषांतर सेवा, झेरॉक्स सेवा, ऑनलाईन सेवा, भाषांतर सेवा, रेफशन, निदर्शने, सारसेवा, इ. प्रचलित सेवा उपलब्ध असल्या पाहिजेत. त्याचबरोबर अधिकाधिक सेवा वाचकांना उपलब्ध करून देणे हे ग्रंथालयाने ध्येय मानले पाहिजे, कारण ग्रंथालय ही सेवाभावी संस्था आहे. त्याचबरोबर सेवांची व्याप्ती अधिकाधिक वाढती राहणे आवश्यक आहे. सर्व प्रकारच्या वाचकांना उपयोगी पडतील असे सेवांचे स्वरूप असले पाहिजे. त्याचप्रमाणे ग्रंथालयातील संपूर्ण ग्रंथसंग्रहाचा वाचक कसा उपयोग करतील याचेही अवधान सेवा देताना असले पाहिजे.

ग्रंथालय सेवा देताना वाचकांचे इतरही गट लक्षात ठेवले पाहिजे. उदाहरणार्थ, महिला गट, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, नवसाक्षर महिला, अपंग याचबरोबर सार्वजनिक ग्रंथालयाने येऊ न शकणाऱ्या वाचकांसाठीही (रुग्ण, कैदी, मतिमंद अतिवृद्धी) सेवा आयोजित केल्या पाहिजेत.

### ४.२ सेवांची गुणवत्ता




**१) कार्यक्षमता**

वाचकांना सेवा नुसत्या देऊन चालणार नाहीत, तर त्या उत्तम, उच्च गुणवत्तेच्या असाव्यात.वाचकांना तत्परतेने व दर्जेदार सेवा दिल्या पाहिजेत. वाचकांना सेवा देताना त्या पूर्ण क्षमतेने दिल्या पाहिजेत.

**२) अद्ययावतता**

माहितीचा प्रचंड प्रमाणात साठा आहे. या साठ्यातून वाचकांना अद्ययावत ताजी माहिती मिळाली पाहिजे.

**३) व्यापकता**

माहिती सेवा पुरविण्याकरिता एखादा डेटाबेस विकत घ्यायचा असेल तर त्याची व्याप्ती किती आहे या गोष्टीचा विचार करावा लागतो.

**४) सुयोग्य वाचनकक्ष**

वाचनकक्षात स्वच्छता असणे, पुरेसा प्रकाश असणे, बाहेरील आवाजाचा त्रास न होणे, वाचन व लेखन सहज करता येईल, अशा खुर्च्या टेबल असणे. वैचारिक स्वरूपाचे अथवा संशोधनासाठी करावयाचे वाचन याकरिता सुरक्षित अशा जागा असणे. त्याचप्रमाणे वातानुकूलतेची सोय असणे हे वाचनकक्षाची गुणवत्ता वाढविणारे घटक होत.

### ४.३ सेवांची मातृसंस्थेच्या कार्याशी सुसंबद्धता

ग्रंथालयातील सेवा मातृसंस्थेच्या नियोजित कार्याशी सुसंबद्ध असली पाहिजे. सार्वजनिक ग्रंथालयाच्या मातृसंस्थेचे म्हणजेच समाजाचे उद्दिष्ट फार व्यापक असते. सार्वजनिक ग्रंथालयाने ते साध्य करण्यासाठी ग्रंथालयाच्या नेहमीच्या कार्यक्रमाबरोबरच अतिरिक्त कार्यक्रम राबविले पाहिजेत.



उदा. व्याख्याने, परिसंवाद, चर्चा, ग्रंथालयाशी निगडित सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धा, इ. विकासाच्या या कार्यासमवेतच दैनंदिन जीवनात अत्यावश्यक माहिती पुरविणे, समाजप्रबोधनास आवश्यक असलेली भित्तिपत्रके, फलकलेखन इ. कार्यक्रम करणे अशा सेवा सार्वजनिक ग्रंथालय देत आहे का हे पाहूनच त्यांचे मूल्यमापन करता येते. इतर ग्रंथालयांच्या सेवा आखणे सोपे असते. संशोधन संस्थेत उत्तम सूचिसेवा हवी. शालेय ग्रंथालयात कथाकथन सेवा हवी. शैक्षणिक ग्रंथालयात परीक्षेच्या वेळी जास्तीत जास्त वेळ ग्रंथालय उघडे ठेवण्याची सोय हवी.

### ४.४ वैशिष्ट्यपूर्ण सेवा

**अभिनव उपक्रम**

१) रांगोळी स्पर्धा
२) वृत्तपत्रांच्या कात्रणांचा संग्रह जमविणे
३) ग्रंथ शोधण्यासाठी कल्पक स्वरूपाची चित्रमय सूचना
४) व्याख्याने, चर्चासत्र आयोजन
५) निबंध स्पर्धा
६) विषयानुसार सूची उपलब्ध करून देणे

अशा प्रकारच्या कित्येक उपक्रमांनी ग्रंथालयात जिवंतपणा आणता येतो. ग्रंथालय देत असलेल्या सेवांचे मूल्यमापन करताना त्या अशा प्रकारच्या वैशिष्ट्यपूर्ण सेवा आहेत हा एक दंडक ठरतो.

### ५) माहिती सेवांचे मूल्यमापन




माहिती सेवांच्या मूल्यमापनाबाबत लॅकेस्टर या तज्ज्ञाने खूप संशोधन करून लिखाण केले आहे. त्यामध्ये प्रतिसाद (Recall), संबद्धता (Relevance) व समर्पकता (Precision) संकल्पना व त्या मोजण्यासाठी प्रस्तुत केलेली समीकरणे हे माहिती सेवांच्या मूल्यमापनाचे निकष आहेत.

हे निकष माहिती प्रतिप्राप्ती संबंधापुरते मर्यादित आहेत. संपूर्ण माहिती सेवेच्या मूल्यमापनास अद्ययावतता, नियमितता हे निकष लावावे लागतात.

## ६) संगणकीकरणाचे मूल्यमापन

संगणकाच्या आगमनानंतर ग्रंथालयाचे संगणकीकरण ओघानेच झाले. संगणकीकरणाचा आधुनिकीकरणाशी मेळ घातल्यामुळे व सर्वांनाच आम्ही मागे नाही हे दाखविण्याची अहमहमिका असल्यामुळे आणि त्याचबरोबर संगणकीकरण ही सर्वार्थाने कठीण बाब असल्यामुळे संगणकीकरणाच्या मूल्यमापनाची आवश्यकता निर्माण झाली आहे. संगणकाच्या मूल्यमापनाची आवश्यकता अशाकरिता आहे की, संपूर्ण संगणकीकरण करण्यासाठी अजून किती वाटचाल करावयाची आहे याचा अंदाज ग्रंथपालास यावा. त्याचबरोबर संगणकीकरणाचा सेवांशी संबंध असल्यामुळे ग्रंथालय सेवांचा दर्जा ठरविण्याच्या कामात संगणकीकरण हा एक महत्त्वाचा भाग ठरतो.

१) यंत्राची उपलब्धी, त्यांची अद्ययावतता व त्यांची देखभाल
२) संगणक प्रणालीची उपलब्धता, अद्ययावतता आणि देखभाल
३) माहिती साठ्याची निर्मिती, गुणवत्ता व अद्ययावतता.
४) तयार माहिती साठ्याची उपलब्धता.
५) अनुषंगिक सोयी
६) ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांचे संगणकाबाबतचे प्रशिक्षण

### १) यंत्राची उपलब्धी, त्यांची अद्ययावतता व त्यांची देखभाल

ग्रंथालयातील सर्व विभागांत आणि तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांस वापरावयास मिळतील इतक्या संख्येने संगणक उपलब्ध असायला हवेत. त्याचबरोबर ते अद्ययावत राखणे शक्य असले पाहिजे. संगणकाबरोबर असणारी यंत्रसामग्री उदा, प्रिंटर, सी. डी. ड्राईव्ह, मोडेम, बहुमाध्यमे वापरण्याची सोय असणारी साधने स्कॅनर इ. सामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध असली पाहिजेत.

### २) संगणक प्रणालीची उपलब्धता, अद्ययावतता आणि देखभाल

ग्रंथालयीन कारभारांच्या प्रत्येक अंगाशी संबंधित परंतु संपूर्णपणे एकात्मिक अशा प्रकारची संगणक प्रणाली भारतातील अगदीच थोड्या ग्रंथालयांत उपलब्ध आहे, कारण अशी प्रणाली ही मूलतः खर्चिक असते. ती अद्ययावत ठेवण्यासाठी बराच खर्च येतो. ग्रंथालयात अशा प्रकारची प्रणाली आहे की नाही हा महत्त्वाचा निकष आहे.



आपल्या देशात तसेच परदेशात अनेक ग्रंथालय संगणकीकरण आज्ञावली विकसित झालेल्या आहेत व नवनवीन विकसित होत आहेत.

देशांतर्गत निर्मित व आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्मित उपलब्ध आज्ञावली पुढीलप्रमाणे–

**देशांतर्गत निर्मित उपलब्ध आज्ञावली**

1) Auto Lib
2) E Granthalaya
3) Libra 2000
4) Librarian
5) Library Manager
6) Libsys
7) Nalands
8) SUM
9) SOUL
10) Rovan LMS[3]

**आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्मित उपलब्ध आज्ञावली**

1) CDS/ISIS
2) Micro Lbrarian System
3) Keystone Library Automation System
4) VTLS
5) ADLIB Library for windows[4]

या संगणक प्रणाली संवादी आणि किती सक्षम आहेत हेही मूल्यमापनाचे निकष आहेत. याचबरोबर या प्रणालीमध्ये ग्रंथालयाच्या स्थानिक गरजांची पूर्तता करणाऱ्या सोयी उपलब्ध आहेत की नाही हा एक महत्त्वाचा निकष आहे.

### ३) माहितीसाठ्याची निर्मिती, गुणवत्ता व अद्ययावतता

ग्रंथालयात काम करण्यासाठी विविध प्रकारचे माहितीचे साठे उत्तम स्वरूपात असणे हे आदर्श संगणकीकरणाचे गमक आहे. ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहातील प्रत्येक ग्रंथाची नोंद अतिशय शास्त्रशुद्ध रितीने, आंतरराष्ट्रीय मानकानुसार केली जाणे हा खरे पाहता ग्रंथालयीन संगणकीकरणाचा मूलभूत पाया आहे. कित्येक ग्रंथालयांत अशा स्वरूपाचा माहितीसाठा उपलब्ध नाही, ही वस्तुस्थिती आहे. याचबरोबर वाचकांचा माहितीसाठा, प्रकाशक, ग्रंथविक्रेते यांचे माहितीसाठे हेही ग्रंथालयाच्या विविध कामांसाठी लागतात. ते किती प्रमाणात उपलब्ध आहेत हा एक महत्त्वाचा निकष आहे.

### ४) तयार माहितीसाठ्याची उपलब्धता

ग्रंथालयास उपयोगी पडतील असे कित्येक माहितीसाठे उपलब्ध आहेत. ते संगणक प्रणालीच्या बाहेर सी.डी. रोमच्या स्वरूपात असतात. तसेच संगणक जाळ्यांच्यामार्फत

केव्हाही उपलब्ध होऊ शकतात. संदर्भग्रंथाच्याप्रमाणे असे महत्त्वाचे किती साठे उपलब्ध आहेत याच्या मोजदादीवरून संगणकीकरणाचा दर्जा मोजता येतो.

### ५) अनुषंगिक सोयी

संगणकीकरणास उत्कृष्ट प्रकारचे वायरिंग, वोल्टेज स्टॅबिलायझर, यी.पी.एस. यंत्र वापरण्यास सोयीचे होईल असे फर्निचर, प्रिंटरला लागणाऱ्या रिबीनी, छपाईला लागणारा कागद, काम करण्यास सुखद होतील अशा टेबल खुर्च्या, बाह्यजगताशी संपर्क साधण्यासाठी आवश्यक संपर्कयंत्रणा, इ. अनुषंगिक बाबींची यादी करून त्याच्या उपलब्धतेची मोजदाद करून संगणकीकरणाचे मूल्यमापन करता येते.

### ६) ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांचे संगणकाबाबतचे प्रशिक्षण

ग्रंथालयीन कर्मचारी प्रशिक्षित नसले तर संगणकीकरणास अर्थच प्राप्त होत नाही. संगणक कर्मचाऱ्यांनीच चालवायचा असतो. अशा प्रकारे प्रशिक्षित झालेले कर्मचारी किती आहेत यावरून हे मूल्यमापन करता येते.

### ७) वाचकांचे मूल्यमापन

ग्रंथालयात वाचक हा सर्वांत मोठा घटक आहे. वाचकाचे समाधान करण्याकरिता वाचकाची नीट ओळख होणे आवश्यक असते. वाचकांचे समाधान करण्याकरिता वाचकाची नीट ओळख होणे आवश्यक असते, म्हणून वाचकाचे मूल्यमापन करणे आवघड असते.

**वाचकांचे पुढील निकषांद्वारे मूल्यमापन करता येते.**

१) ग्रंथालयाबद्दल अस्था असणारे वाचक
२) करमणुकीचे साहित्य वाचणारे वाचक
३) एखाद्या विषयावरील जिज्ञासूच्या वृत्तीने वाचन करणारे वाचक
४) संशोधन प्रवृत्तीने वाचन करणारे वाचक
५) सर्व प्रकारचे पण उत्तम साहित्य वाचणारे चोखंदळ वाचक
६) व्यावसायिक लेखन करणारे वाचक
७) आय.एस.ओ. ९००० एक उपयुक्त शिस्त

आजच्या काळात गुणवत्तेला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. कोणत्याही वस्तू अथवा सेवेचे महत्त्व तिच्यातील गुणवत्तेवर ठरत असते. कोणत्याही संस्थेला (औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक, तांत्रिक) आपली प्रगती साधावयाची असेल तर त्या संस्थेने



ठरविलेली ध्येये, उद्दिष्टे, वैशिष्ट्ये यांची पूर्ती करण्याकरिता अस्तित्वात असलेल्या कार्यप्रणातील दोष काढून काही नवीन सुधारणा करून किंवा नवीन व्यवस्थापन तंत्राचा वापर करून संस्थेचा विकास साधावयाचा असतो. त्याकरिता या जागतिकीकरणाच्या युगात नवनवीन व्यवस्थापन तंत्राचा वापर करून संस्थेचा विकास साधावयाचा असतो. त्यापैकी ISO 9000 एक व्यवस्थापनाचे तंत्र आहे.

ISO या पद्धतीमुळे संस्थेची व संस्थेतील कर्मचाऱ्यांची वैयक्तिक विकासाची अशा दोन्ही पातळ्यांची सुधारणा होते. तसेच सततच्या परीक्षणामुळे कायम सुधारणा होत राहते आणि वाचकांचे समाधान होते.

### ९) नॅक : National Assessment and Accreditation Council

नॅकने भारतातील उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यांकन करण्यास १९९४ पासून प्रारंभ केला. भारतातील विद्यापीठे व महाविद्यालये यांनी आपण होऊन पुढे येऊन आपले मूल्यांकन करून घ्यावे. सरकाही किंवा यु.जी.सी.चे अनुदान, शिक्षण संस्थांना मिळणाऱ्या देणग्या, विद्यार्थी, पालक व जनसामान्यांतील शिक्षण संस्थेची प्रतिमा, इ. अनेक महत्त्वाच्या गोष्टी या नॅककडून होणाऱ्या मूल्यांकनावर अवलंबून आहेत.

### मूल्यमापनाचे सूत्र : नॅकची श्रेणी

प्रत्येक कसोटीसाठी नॅकने निश्‍चित केलेले गुण आणि त्या कसोटीतील प्रश्‍नांच्या, प्रमाणकांच्या संदर्भात तज्ज्ञ समितीने दिलेले गुण या दोहोच्या साहाय्याने त्या शैक्षणिक संस्थेचे मूल्यमापन केले जाते. नॅकच्या मूल्यमापनाच्या सात कसोट्या आहेत. या कसोट्यांतील चौथी कसोटी पायाभूत सुविधा आणि अध्ययन सामग्री / साधन ही आहेत.

या कसोटीची गुणवत्तादर्शक विधाने पुढीलप्रमाणे–

संस्थेत ग्रंथालय, संगणक आणि तर अध्ययन साधने पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत आणि त्यांचा योग्य तो उपयोग सर्व संबंधितांना सहजपणे करता येतो.

विद्यापीठे, स्वायत्त महाविद्यालये आणि संलग्नित महाविद्यालये मूल्यांकनासाठी या तीनही घटकांना नॅक ने एकूण गुण (१०००) दिले आहेत. त्यापैकी चौथ्या पॅरामिटरमध्ये १५० गुण दिले आहेत. त्यापैकी ग्रंथालयास ३५ गुण दिले आहेत. सर्व सातही पॅरामीटरमध्ये ३०० हून अधिक गुण ग्रंथालयाच्या विविध घटकांसाठी आहेत.

भारतातील उच्च शिक्षण संस्थांना स्वयंमूल्यमापनाची पद्धत समजावून द्यावी. त्यांची बलस्थाने आणि त्यांच्यातील उणिवा यांची त्यांना त्यांच्या स्वयंअभ्यासातूनच

योग्य कार्यपद्धती राबवावी अशी अपेक्षा नॅकने व्यक्त केली आहे.

नॅकने Guidelines on Quality Indicators या पुस्तिकेत महाविद्यालयीन ग्रंथालयांसाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत.

**Best Practices for College Libraries**

Listed below are some of the 'best practices' that enhance the academic information environment and usability.

1. Computerization of library with standard digital software.
2. Inclusion of sufficient information about the library in the college prospectus.
3. Compiling student/teacher attendance statistics and locating the same on the notice board.
4. Displaying newspaper clipping on the notice board periodically.
5. Career/Employment information services.
6. Internet facilities to different user grops.
7. Information literacy programs.
8. Suggestion box and timely response.
9. Displaying new-arrivals and circulating a list of those tc academic departments.
10. Conducting book exhibitions on different occasions.
11. Organizing book talks.
12. Instituting annual best user award for students.
13. Organizing competitions annually.
14. Conducting user surveys periodically.

## समारोप

ग्रंथालयाचे मूल्यमापन करताना ग्रंथसंग्रह, ग्रंथालय सेवा, माहिती सेवा, ग्रंथालयीन संगणकीकरण या बाबींचा विचार केला जातो. ग्रंथालय मूल्यमापन हे ग्रंथालयास प्रगतिपथावर घेऊन जाते. समाजातील ग्रंथालयाचा दर्जा, स्थान व प्रतिमा वाढविण्यास मूल्यमापन मदत करते. यामुळे सर्व प्रकारच्या ग्रंथालयांनी आपल्या क्षमतेनुसार व योग्य पद्धतीने मूल्यमापन करून घेऊन ग्रंथालयास नवीन मार्ग, नवीन दिशा निर्माण करून सामाजिक बांधीलकी जोपासावी. तसेच ग्रंथालयाची गुणवत्ता सुधारण्यासाठी नॅक ISO 9000 या तंत्राचादेखील विचार करणे आवश्यक आहे.



## संदर्भग्रंथ


१) वीर, धर्मराज, दीर्घोत्तरी : ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, ग्रंथपरिवार, जुलै २००५, पृ. २०.

२) पवार, एस. पी. आणि बडकत्ते, ए., ग्रंथालय व माहितीशास्त्र (२००५), कोल्हापूर, फडके प्रकाशन, पृ. ३२८.

३) फडके, द. ना. ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण (२००७), पुणे , युनिव्हर्सल प्रकाशन, पृ. ७३.

४) भगत, रवींद्र आणि कंठाळे, सुरेश, आय.एस.ओ. ९००० एक उपयुक्त शिस्त, ज्ञानगंगोत्री : डिसें.-जाने.-फेब्रु. २०१०, पृ. ३३.

५) देशपांडे, एस. व्ही. आणि पाटील, जगन्नाथ, नॅक : पुनर्मूल्यांकन आणि महाविद्यालयांचे प्रशासन (२००५), पाटण, सुखदा सौरभ प्रकाशन, पृ. ३४.

# ग्रंथपरिचय

डॉ. राजेंद्र विठ्ठल चिकटे
जयकर ग्रंथालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

Title : Library and Information Science Research : Methods and Techniques.
Author : Dr. Rajendra Kumbhar
Publisher : Universal Publication, Pune
Publication Year : 2014
ISBN : 978-81-87552-62-8
Price : Rs. 495/-

कोणत्याही विषयाचा विकास होण्याच्या दृष्टीने आज संशोधनाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. संशोधनाशिवाय विकास शक्य नाही हे लक्षात आल्यामुळे प्रत्येक क्षेत्रामध्ये संशोधनाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्याला ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अपवाद ठरू शकत नाही. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयाचा आजपर्यंतचा प्रवास आणि त्याचा विकास लक्षात घेतला तर ग्रंथालयशास्त्रातील प्रत्येक विषय हा संशोधनाचा भाग आहे. उदा. वर्गीकरण, तालिकीकरण, वाचन साहित्यसंग्रह इ. या विषयामध्ये वेळोवेळी संशोधन झाल्यामुळे आज आपण योग्य वाचकाला योग्य माहिती योग्य वेळी योग्य त्या स्वरूपात उपलब्ध करून देऊ शकतो.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्ये संशोधनावर अनेक ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. त्यातील उत्कृष्ट पुस्तक म्हणजे Busha, C.H. and Harter, S. P. यांनी लिहिलेल्या 'Research Methods in Librarianship Techniques & Interpretation' या ग्रंथामध्ये संशोधनातील संकल्पनाविषयी सविस्तर माहिती आहे, पण ती विखुरलेल्या स्वरूपात आहे. या ग्रंथाचे वाचन करते वेळी भाषा क्लिष्ट (अवघड) वाटते. ही उणीव यापुढे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील संशोधकांना जाणवणार नाही. कारण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील प्रा. डॉ. राजेंद्र कुंभार यांचे Library and Information Science



Research : Methods and Techniques. या ग्रंथामध्ये संशोधकाला विषयाच्या निवडीपासून संशोधन अहवाल प्रकाशित करण्यापर्यंत सर्व संकल्पनांची सविस्तर माहिती दिलेली आहे. जरी हा ग्रंथ इंग्रजी भाषेत असला तरी त्याचे वाचन करते वेळी प्रत्यक्ष लेखक आपल्याला त्या विषयावर व्याख्याने देत आहेत असा भास होतो.

डॉ. राजेंद्र कुंभार यांनी या ग्रंथाची मांडणी एकूण १७ प्रकरणांमध्ये केलेली आहे. या सर्व प्रकरणांचे एकाग्रतेने वाचन केले तर संशोधकाना, संशोधन करण्याबाबत योग्य मार्गदर्शन आणि दिशा या ग्रंथामुळे मिळणार आहे.

प्रकरण एकमध्ये डॉ. कुंभार यांनी संशोधन म्हणजे काय? त्याचा अर्थ, प्रक्रिया आणि त्याची गरज त्याचबरोबर संशोधनातील पायऱ्या या संकल्पना सविस्तरपणे समजावून सांगितल्या आहेत. ग्रंथालयशास्त्रामध्ये संशोधनाची गरज काय हे सांगते वेळी ग्रंथालय आणि ग्रंथालयातील कार्य पार पाडण्यासाठी साधनांचा विकास उदा. वर्गीकरण पद्धती, शब्दकुलकोश (Thesauri), ग्रंथालय व्यवस्थापन आज्ञावली इ. सेवा आणि सुविधांचा विकास, व्यवस्थापकीय निर्णय घेण्यासाठी, ग्रंथालयीन समस्या सोडविण्यासाठी उपयोजकांना जाणून घेण्यासाठी सिद्धान्त आणि तत्त्वे मांडण्यासाठी, सिद्धान्त आणि तत्त्वे यांचे उपयोजन करण्यासाठी, ग्रंथालय क्षेत्राला उच्च दर्जा प्राप्त करून देण्यासाठी, व्यावसायिक हित जपण्यासाठी, संशोधनात्मक कार्य पूर्ण करण्यासाठी, बदल समावून कौशल्य विकासित करण्यासाठी, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हे व्यवसाय आहे हे सिद्ध करण्यासाठी, ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचा प्रभाव ठेवण्यासाठी अशा चौदा कारणांसाठी ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्ये संशोधनाची गरज आहे असे उदाहरण दाखल सांगितलेले आहे.

प्रकरणाच्या शेवटी ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामधील संशोधनात संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ होत आहे, असे नमूद करून त्यात आणखी वाढ होणे गरजेचे आहे आणि त्यासाठी भरपूर वाव आहे असे लेखकाचे म्हणणे आहे.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयात संशोधनाला वाव आहे. हे प्रकरण एकमध्ये नमूद केल्यानंतर प्रकरण दोनमध्ये संशोधन समस्येचा शोध आणि त्याची मांडणी हे संशोधकाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. संशोधन समस्येचा शोध म्हणजे संशोधन विषयाचा शोध घेणे आणि संशोधन समस्येची मांडणी म्हणजे संशोधनाची उद्दिष्टे, हेतू, व्याप्ती, संशोधन पद्धती, इत्यादी स्पष्ट करणे, उद्दिष्टे कशी लिहावीत? ती कशी असावीत? किती असावीत? व्यक्ती कशी ठरवावी, गृहीतकाची मांडणी कशी करावी आणि त्याचबरोबर संशोधन आराखड्याची निवड करण्याबाबत सविस्तर माहिती दिलेली आहे. यावरून संशोधन समस्येची निवड आणि त्याची मांडणी हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे हे लक्षात येते.

वरील बाबीच्या सखोल माहिती बरोबर याच प्रकरणामध्ये संशोधन समस्येचा शोध घेण्यासाठी कोणती साधने आहेत आणि त्यावरून संशोधन समस्या किंवा विषय कसा असेल याचा उत्कृष्ट असा तक्ता दिलेला आहे. त्याचबरोबर ग्रंथालयशास्त्रातील वस्तुस्थिती आणि घटक व त्यानुसार उपलब्ध असलेल्या संशोधन समस्या कोणत्या याचाही तक्ता या प्रकरणामध्ये दिलेला आहे.

संशोधन योग्य समस्या हीच चांगली संशोधन समस्या असते आणि त्याची पुढील वैशिष्ट्ये आहेत असे लेखकांनी नमूद केलेले आहे. संशोधन समस्या ही नवीन असावी, उपयुक्त असायला हवी, त्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध असाव्यात, संशोधकाला समस्येविषयी पुरेसे ज्ञान असावे, संशोधन समस्येविषयी संशोधकाला आवड असावी, संशोधन समस्येची व्याप्ती मर्यादित असावी, डेटा किंवा माहिती उपलब्ध असावी, नैतिकदृष्ट्या संशोधन करण्याच्या दृष्टीने विषय असावा अशी आठ वैशिष्ट्ये सांगून प्रत्येक वैशिष्ट्यासाठी उदाहरणे दिलेली आहेत.

विस्तीर्ण विषयाकडून सूक्ष्म विषयाकडे संशोधन विषयाचा प्रवास कसा होतो, स्थूल/विस्तीर्ण विषय आणि सूक्ष्म विषय कोणते याची माहिती तक्त्याच्या स्वरूपात खूपच छान प्रकारे दिलेली आहे. उदा. e-book या विस्तीर्ण विषयातील सूक्ष्म विषय कोण कोणते हे आकृतीच्या स्वरूपात सविस्तरपणे मांडलेले आहेत. प्रकरणाच्या शेवटी संशोधनाची मांडणी करते वेळी प्रत्येक पायरी आणि त्याबाबतची उदाहरणे दिलेली आहेत. संशोधन समस्येच्या मांडणीनुसार संशोधन पद्धती, माहिती संकलनाचे साधन, संशोधन आराखडा, नमुना निवड, माहिती विश्लेषणाचे सांख्यिकी तंत्र, इत्यादीच्या निवडीसाठी संशोधक निर्णय घेऊ शकतो आणि यावरच संशोधनाची गुणवत्ता आणि वाढ अवलंबून आहे, असे लेखकांनी नमूद केलेले आहे.

प्रकरण तीनमध्ये पूर्वसाहित्याचा शोध (Review of Literature), पूर्वीच्या संशोधनाचे वाचन आणि त्याचा वापर याविषयी माहिती देत असताना साहित्य म्हणजे काय? त्याची वर्गवारी, ग्रंथालयशास्त्रातील संशोधनासाठीचे उपयुक्त साहित्य कोणते याची माहिती, तक्त्याच्या स्वरूपात डेटाबेसेसची नावे, त्यांचे वर्णन आणि उपलब्धता, त्यांचे फायदे, Online मोफत नियतकालिके, वर्गणी भरून मिळणारी मुद्रित आणि Online स्वरूपातील नियतकालिके यांची यादी वेबच्या पत्त्यासह दिलेली आहे. त्याचबरोबर साहित्यशोधाची प्रक्रिया सांगून वाचन साहित्याचा आढावा म्हणजे काय? त्याचा हेतू आणि महत्त्व, आढावा लिहिण्याची प्रक्रिया, त्याचे प्रकार, संदर्भ देण्याची पद्धत, इत्यादीबाबतची परिपूर्ण माहिती या प्रकरणामध्ये दिलेली आहे.



प्रकरण चारमध्ये संशोधन आराखडा /रूपरेषा / proposal याविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे. संशोधन आराखडा म्हणजे काय? त्याचे घटक, गुणदोष सांगून शेवटी संशोधन आराखड्याचा आदर्श असा नमुना दिलेला आहे. या प्रकरणामुळे नवीन संशोधकांना त्यांचा विषय निश्चित केल्यानंतर संशोधन आराखडा किंवा त्याची रूपरेषा ठरविणे सहज शक्य होणार आहे.

प्रकरण पाचमध्ये लेखकांनी संशोधन पद्धती आणि संशोधनाचे प्रकार याविषयी माहिती दिलेली आहे. यात त्यांनी हेतूनुसार संशोधनाचे प्रकार, संशोधनाच्या उपयोगानुसार प्रकार, वेळेनुसार प्रकार, डेटाच्या प्रकारानुसार संशोधनाचे प्रकार त्याचबरोबर तुलनात्मक पद्धती, पद्धती विश्लेषण, Operation Research, नमुना विकास संशोधन, उत्पादन/साधन संशोधन डेल्फी संशोधन, तंत्रज्ञानावर आधरित संशोधन, बिब्लिऑमॅट्रिक्स, युझर स्टडी, युज स्टडी, प्रत्यक्ष कार्य क्षेत्रावरील संशोधन (Field Study) अशा प्रकारे सर्वच संशोधन पद्धतीची माहिती एकत्रित रित्या देणारे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील हे एकमेव साधन आहे.

प्रकरण सहामध्ये सर्वेक्षणाविषयी माहिती दिलेली आहे. यात ग्रंथालय आणि माहिती शास्त्रातील सर्वेक्षणाची व्याप्ती उदाहरणादाखल नमूद केलेली आहे. त्याचबरोबर सर्वेक्षणाची गरज, प्रकार, नमुना निवड पद्धती आणि सर्वेक्षणातील वेगवेगळ्या पायऱ्या याविषयी सविस्तर माहिती या प्रकरणामध्ये दिलेली आहे.

प्रकरण सातमध्ये व्यष्टी अध्ययन पद्धती (Case Study) म्हणजे काय? त्याची एकक, व्यष्टी अध्ययन आणि सर्वेक्षण, व्याष्टी अध्ययनाची वैशिष्ट्ये, ती केव्हा उपयोगाची असते? तिची उद्दिष्टे, त्यातील उपयोगी तंत्रे आणि साधने प्रकार, एक आणि एकापेक्षा जास्त व्याप्ति अध्ययन, त्यातील पायऱ्या, अडचणी याविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे.

प्रायोगिक संशोधन पद्धती म्हणजे का ? त्यातील पायऱ्या प्रायोगिक गट आणि नियंत्रित गट, प्रकार याबाबत सविस्तरपणे सांगून या संशोधन पद्धतीनुसार संशोधन कसे करतात याविषयी सविस्तर माहिती प्रकरण आठमध्ये दिलेली आहे.

प्रकरण नऊमध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धती म्हणजे काय ? त्यातील पायऱ्या, त्यातील माहिती साधनाचे आंतरबाह्य मूल्यमापन, ग्रंथालय क्षेत्रातील या संशोधन पद्धतीचे महत्त्व, या क्षेत्रातील या पद्धतीसाठीच्या योग्य समस्या, प्रकार याविषयी परिपूर्ण माहिती दिलेली आहे.

आशय विश्लेषण (Content Analysis) म्हणजे काय ? त्यातील पायऱ्या, वैशिष्ट्ये, फायदे, मर्यादा याविषयी सविस्तर माहिती प्रकरण दहामध्ये दिलेली आहे. या

ग्रंथातील महत्त्वाचा भाग आणि संशोधनातील महत्त्वाचा भाग म्हणजे संशोधनातील माहिती संकलन. प्रश्नावली हे माहिती संकलनाचे एक महत्त्वाचे साधन आहे. वेगवेगळी तंत्रे वापरून प्रश्नावलीद्वारे माहिती संकलन केले जाते. प्रश्नावली हे साधन कसे ? आणि तंत्र कसे ? याविषयी परिपूर्ण माहिती प्रकरण अकरामध्ये दिलेली आहे. प्रश्नाचे आणि प्रश्नावलीचे प्रकार, प्रश्नावली सोबतचे पत्र कसे असावे, त्याचा नमुना, प्रश्नावलीचे वितरण आणि संकलनचे व्यवहार चातुर्य वापरून जास्तीत जास्त प्रतिसाद कसा मिळवायचा, प्रश्नावलीचे फायदे तोटे, प्रश्नावली हे माहिती मिळविण्याचे साधन आहे. प्रश्नावलीद्वारे माहिती कशा प्रकारे मिळवायची हे तंत्र आहे. याविषयी परिपूर्ण अशी माहिती देणारे हे एकमेव साधन आहे. संशोधन पद्धतीतील अनेक ग्रंथांपैकी फक्त याच ग्रंथात ही माहिती सविस्तरपणे दिलेली आहे. त्यामुळे माहिती संकलनातील तंत्रे कोणती आणि साधने कोणती यातील संभ्रम या प्रकरणामुळे दूर होणार आहे.

माहिती संकलनातील आणखी एक तंत्र म्हणजे 'मुलाखत.' याविषयी प्रकरण बारामध्ये माहिती दिलेली आहे. यात मुलाखत म्हणजे काय ? त्याचे प्रकार, फायदे, मर्यादा, प्रतिसाद मिळविण्याचे तंत्र, प्रश्नातील सर्वसामान्य चुका यांविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे.

संशोधनातील माहिती संकलनचे सर्वांत विश्वसनीय आणि भरवश्याचे तंत्र म्हणजे निरीक्षण (Observation). याविषयीची माहिती प्रकरण तेरामध्ये दिलेली आहे. निरीक्षण म्हणजे काय ? निरीक्षण आणि इतर माहिती संकलन तंत्रे, निरीक्षणाचे प्रकार, निरीक्षणाची प्रक्रिया, उपयोगी साधने, फायदे आणि मर्यादा याविषयी परिपूर्ण माहिती या प्रकरणातून प्राप्त होते.

नमुना निवड हे संशोधनातील माहिती संकलनाचे उपयुक्त तंत्र आहे. याविषयी माहिती देतेवेळी नमुना निवडीची मूळ संकल्पना, माहिती संकलनाचे क्षेत्र/गट, नमुना निवडीचे घटक, चौकट, प्रतिनिधित्व करणारा नमुना, विशेष गुण, कल, अडथळा, प्रकार, आकार, तत्त्वे, गरज, फायदा अशा सर्व अंगांनी परिपूर्ण अशा नमुना निवड तंत्राची माहिती प्रकरण १४ मध्ये दिलेली आहे. रॅन्डम नंबरच्या तक्त्याच्या पद्धतीने नमुना कसा निवडावा हे सोदाहरण स्पष्ट केले आहे. तसेच नमुन्याचे योग्य प्रमाण कसे ठरवावे हे सांगितले आहे.

प्रकरण पंधरामध्ये गृहीतके (Hypotheses) या घटकाविषयी माहिती दिलेली आहे. यात गृहीतके म्हणजे काय ? त्याची साधने, कार्ये, वैशिष्ट्ये, प्रकार, संशोधन गृहीतक, गृहीतकाची पडताळणी, त्यातील समस्या किंवा अडचणी, पडताळणीतील पायऱ्या अशा प्रकारची सर्वतोपरी माहिती या प्रकरणात मिळते.



सांख्यिकी आणि माहिती सादरीकरणाचे तंत्र, ज्याच्यावर संशोधनाचा प्रभाव अवलंबून आहे. अशा घटकाची माहिती देत असताना लेखकाने या संकल्पनेशी निगडित सर्व घटकांविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे. जसे संख्याशास्त्र म्हणजे काय ? त्याचे कार्य, प्रकार, माहितीचे वर्गीकरण आणि सारांश, आलेख आणि त्याचे प्रकार, काय स्क्वेअर टेस्ट, पातळीचे महत्त्व (Level of Significance), सहसंबंध, प्रतिगमन, याविषयी सविस्तर माहिती प्रकरण सोळामध्ये दिलेली आहे.

शेवटच्या प्रकरणामध्ये संशोधन अहवाल लिहिण्याचे तंत्र याविषयी माहिती देते वेळी, संशोधन अहवाल म्हणजे काय ? त्याचा हेतू काय ? त्याची रचना, संदर्भ देण्याच्या किंवा उद्धरणाच्या पद्धती, भाषा आणि मुद्रण शैली यातून अचूकता याविषयी सखोल माहिती दिलेली आहे. अशा प्रकारे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील संशोधकांना अत्यंत उपयोगी असणारा हा ग्रंथ प्रत्येक संशोधकाने वाचणे उपयुक्त ठरेल. ज्यांना ज्ञान मिळविण्यासाठी संशोधन करावयाचे आहे, त्यांच्यासाठी हे साधन संशोधनाला सुरुवात करण्यापासून संशोधनाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत वेळेवेळी मदतीला येऊ शकणारा हा ग्रंथ डॉ. राजेंद्र कुंभार यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयासाठी लिहून या विषयाच्या विकासात भरच टाकली आहे.

या ग्रंथाचा परिचय करून देत असताना परिचय कर्त्याला या ग्रंथाची काही वैशिष्ट्ये जाणवलेली आहेत ती पुढीलप्रमाणे–

डॉ. कुंभार यांनी प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीला सारांश, संबंधित संज्ञा दिलेल्या आहेत आणि शेवटी निष्कर्ष दिलेला आहे. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी संदर्भ साहित्याची यादी दिलेली आहे. ग्रंथ समजण्यास सोप्या अशा लेखकाच्या स्वतःच्या भाषेत लिहिल्यामुळे, लेखक संशोधन पद्धतीवरती आपल्याशी बोलत आहेत किंवा व्याख्यान देत आहेत असा भास ग्रंथाचे वाचन करते वेळी पुन्हा-पुन्हा होतो. आवश्यक त्या ठिकाणी ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील अनेक उदाहरणे देऊन लेखक विद्यार्थ्यांना संशोधन करण्यास प्रोत्साहन देत आहेत असे वाटते. ग्रंथाच्या मुख्य पृष्ठावरून असे वाटते की, संशोधनकर्त्याने संशोधन करतेवेळी पारंपरिक साधनाबरोबर इलेक्ट्रॉनिक साधनांचाही वापर करण्याची गरज आहे. अशा प्रकारे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील प्रत्येक विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षक या सर्वांनी या ग्रंथाचे वाचन करून त्यातील बारकाव्याचा संशोधनामध्ये वापर केला तर या विषयातील संशोधनामध्ये संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ होत राहणार आहे.